मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

www.dainikmahasagar.in Epaper: www.epaper.dainikmahasagar.in

RNI No.: MAHAMAR/2014/62313 | सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ | वर्ष: १२ | अंक: ८४ | पाने-८

किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू. ३

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
५०६, यशवंत सूत टॉवर, स्मार्ट बाजारच्या मागे,
आदिनाथ अपार्टमेंट समोर,विरार प. मोबाईल नं. ९०११०५५४१३

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९४२०६९१४२०

## केदारनाथचे द्वार २२ एप्रिलला उघडणार

**डेहराडून , दि. १५ प्रतिनिधी**

उत्तराखंडमधील प्रसिद्ध केदारनाथ मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी यावर्षी २२ एप्रिल रोजी उघडले जाणार आहेत. हिवाळ्यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून बंद असलेले हे मंदिर पुन्हा एकदा भक्तांच्या जयघोषाने दुमदुमणार असल्याची माहिती मंदिर समितीच्या अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर यात्रेचा मुहूर्त निश्चित करण्यात आला.

श्री बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीचे जनसंपर्क अधिकारी हरीश गौर यांनी सांगितले की, भगवान केदारनाथांचे हिवाळी वास्तव्य असलेल्या ओंकारेश्वर मंदिरात हा निर्णय घेण्यात आला. हिंदू पंचांगानुसार गणना करून मंदिर उघडण्याची वेळ निश्चित केली. १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या केदारनाथ मंदिराचे कपाट २२ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता उघडले जातील.



# कुठे शिवराय, कुठे टिपू




महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ नेहमीच जनतेच्या प्रश्नावर बोलतात. त्यांच्या मागे चौकशीचे कोणतेही शुक्लकाष्ट नाही कुठेही, कोणत्याही बँकेचे कर्ज घेऊन त्यांनी संस्था उभ्या केलेल्या नाहीत. शुद्ध गांधीवादी मार्गाने जाणारा हा कार्यकर्ता आहे. काही वर्षांपूर्वी म्हणजे आमदार होण्यापूर्वी त्यांनी ज्येष्ठ गांधीवादी नेते गडचिरोली जिल्ह्यातील सर्च या संस्थेचे डॉक्टर अभय बंग यांचे पिताश्री ठाकूरदास बंग यांच्या नेतृत्वात बुलढाणा जिल्ह्यात पदयात्रा काढली. त्यामागे त्यांची ग्राम सुधारणेसाठी फार मोठी तळमळ होती. अनेक विधायक कामात त्यांचा पुढाकार असतो हे आम्ही स्वतः बघितलेले आहे अशा या निष्कलंक असणाऱ्या काँग्रेसच्या अध्यक्षाला बोलताना आपण कोणती भाषा वापरतो, कोणाबद्दल काय बोलतो आणि त्याचे कोणते परिणाम होतील. त्यामुळे आपल्या विरोधकांना आयतेच कसे कोलीत मिळेल किंवा मिळणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक होते. परवा बुलढाणा येथे एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी शौर्य आणि स्वराज्याचा विचार दिला अगदी त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी त्याच्या समकक्ष काम केले आहे असा दाखला दिला. त्यानंतर टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे असे म्हणून नको ती उठाठेव करण्याची खरंच काय गरज होती हेच आम्हाला समजत नाही. छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य संस्थापक होते त्यांनी मोगलांच्या सुलतानी शाह्यांना टक्कर देऊन आपले स्वराज्य स्थापन केले. ते एवढे मजबूत होते की, त्यानंतर औरंगजेबाला आधी दिल्ली आणि नंतर आग्रा सोडून मराठ्यांना पराभूत करण्यासाठी महाराष्ट्रात यावे लागले. शेवटी औरंगजेबाचे प्राण अल्लाहने या महाराष्ट्रातूनच उचलून नेले आणि त्यानंतरच्या अवघ्या पंधरा वर्षाच्या आत मोगल साम्राज्य जे कोसळले ते पुन्हा उभे राहिलेच नाही. त्यानंतरचे त्यांचे वंशज मराठ्यांच्या वर्चस्वाखाली होते हेही इतिहासात नमूद आहे. अशा स्वराज्य संस्थापना करणाऱ्या भारताच्या इतिहासातील विश्ववंदनीय राज्यकर्त्याची तुलना वालिदाने स्थापन केलेल्या गादीवर बसणाऱ्या टिपू सुलतान सोबत करावी हे कोणालाही पटणार नाही. टिपू सुलतान याने इंग्रजांविरुद्ध लढाई केली पण त्याच्या राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या सर्व धर्मांचा आदर करणाऱ्या विचारांचा पायंडा नव्हता. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक मंदिरांचा उद्धार केला तसेच मुस्लिमांसाठी मशिदींचा उद्धार करून त्या उभारण्यात आम्ही मदतही केली. जर कधी युद्धकाळात हाती कुराण सापडले तर ते आपल्या सैन्यातील मुसलमान अधिकाऱ्याला किंवा शिपायाला आदराने देत असत, हाही इतिहास सर्वश्रुत आहे. तेव्हा शिवाजी महाराजांच्या पासंगालाही पुरणार नाही अशा टिपू सुलतानाला शिवाजी महाराजांच्या समकक्ष दाखवून सांगण्याची अवदसा हर्षवर्धन यांना कसे काय आठवली, हाच मोठा प्रश्न आहे. त्यांच्या या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी असं व्यक्त करताना त्यांना लाज वाटली पाहिजे हे शब्द उच्चारले. टीपू सुलतान आणि शिवाजी महाराज यांची अशी तुलना केल्यामुळे विनाकारण वादाला तोंड फुटलेले आहे. भारतीय जनता पक्षाला मुस्लिम मते नकोतच असे त्यांचे म्हणणे आहे, इकडे काँग्रेस पक्षाला फक्त मुस्लिम मतेच हवी आहेत काय? काँग्रेस पक्ष सर्वधर्म समभावाला मानतो पण असे करताना एखादे विधान कसे स्वतःच्याच अंगलट येऊ शकते याचा नमुना म्हणजे सपकाळ साहेबांचे हे विधान आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्यासमोर असलेल्या कितीतरी प्रश्नांवर बोलणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न तर आत्महत्या करायला लावणारेच आहेत. महागाई दिवसेंदिवस डोंगरासारखी वाढत आहे, बेकारी बेकरीतून निघणाऱ्या पावासारखी फुगत आहे. तेव्हा आजचे हे प्रश्न डोळ्यासमोर आ वासून उभे असताना त्यावर राहुल गांधी यांच्यासारखे घणाघाती हल्ले त्यांना करता येतात आणि तेच विरोधी पक्षाचे काम आहे, ते सोडून नको त्या वादात स्वतःला गुंतवून घ्यायचे कारणच काय. भारतीय जनता पक्ष विरोधात असताना अगदी नेमक्या मुद्द्यावर त्यांनी आंदोलने केली आणि आज ते सत्तेवर आहेत. त्यांची सत्तेवरील मांड आजच्या घडीला इतकी पक्की आहे की त्यांना विरोध करून सत्ता मिळवणे सोपे नाही. दृश्य बहुमत असूनही चंद्रपूरमध्ये चंद्र उगवलाच नाही उलट तो मावळलाच ना. काँग्रेस पक्षातील लंबीचवडी भांडणे सोडवणे हाच त्यांच्या समोरील मोठा प्रश्न आहे. गटागटातील विभागणी सोडवण्याऐवजी टीपू सुलतान यांना थोर बनवणे हे नको ते कर्म आहे. त्याचे मर्म ओळखून आता तरी त्यांनी आपल्या स्वभावानुरूप सभ्यवाणीत बोलावे. एवढेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा मातृतीर्थ जिल्हा असलेल्या बुलढाणा करांबरोबर महाराष्ट्राच्या संपूर्ण जनतेचे म्हणणे आहे.

जय जिजाऊ! जय शिवराय!!

mahasagarngp@gmail. com
Mob. No. 9922970023

# पुण्यात भाजप-काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये राडा

**पुणे, दि. १५ प्रतिनिधी**

**काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी करणारे वक्तव्य केल्यानंतर राज्यात राजकारण तापलं आहे. सपकाळ यांच्या वक्तव्यानंतर भाजपाचे कार्यकर्ते राज्यभरात आंदोलन करत आहेत. या अनुषंगाने आज पुण्यात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केलं. मात्र, यावेळी भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्यानंतर मोठा राडा झाला.**

भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पुणे काँग्रेस भवनाच्या बाहेर आंदोलन करत घोषणाबाजी केली. या आंदोलनावेळी दगडफेक आणि बाटल्या फेकल्याचा आरोप काँग्रेसने केला असून यामध्ये काही गाड्यांचे मोठे नुकसान झाले. तसेच काँग्रेसच्या एका कार्यकर्त्याला दगड लागल्याने तो रक्तबंबाळ झाल्याचं सांगितलं जात आहे. या घटनेनंतर हर्षवर्धन सपकाळ यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत भाजपावर जोरदार हल्लाबोल केला. 'पुण्यातील भाजपाचे गुंड काँग्रेस कार्यालयावर चाल करुन आले, भाजपाच्या दंगलखोरांवर तात्काळ गुन्हे दाखल करून अटक करा', अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांनी "छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांचे काम समकक्ष आहे" असे विधान केल्याचा आरोप भाजपने केला आहे. या विधानाच्या निषेधार्थ भाजपने पुण्यात आंदोलन पुकारले. भाजपने सपकाळ यांचा टिपू सुलतानच्या वेशभूषेतील मॉर्फ केलेला फोटो पोस्टर्सवर लावून त्याला 'जोडे मारो' आंदोलन केले. तसेच काँग्रेस भवनासमोर "झाले बहु, होतील बहु, परंतु यासम हा" अशा आशयाचे बॅनर लावून आपला संताप व्यक्त केला.

दुसरीकडे, काँग्रेसने हे आंदोलन चुकीचे असल्याचे सांगत सपकाळ यांचे समर्थन केले आहे. "भाजपनेही यापूर्वी टिपू सुलतानच्या फोटोंचा वापर केला आहे, त्यावर भाजप काय उत्तर देणार?" असा सवाल काँग्रेसने उपस्थित केला. तसेच, पुणे शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने 'एपस्टाईन फाइल्स' संदर्भात पंतप्रधान मोदींवर झालेल्या आरोपांवरून लक्ष वळवण्यासाठी भाजप हे स्टंट करत असल्याचा प्रतिआरोप करण्यात आला. भाजप कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. यामध्ये एक कार्यकर्ता जखमी झाल्याचा दावाही करण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान परिसरात उभ्या असलेल्या गाड्यांची तोडफोड करण्यात आली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना काँग्रेस भवनमध्ये रोखून धरले. या राड्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते अधिकच आक्रमक झाले असून त्यांनी फरासखाना पोलीस स्टेशनसमोर आंदोलन सुरू केले आहे. भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी काँग्रेसने लावून धरली आहे.




### सपकाळांच्या तोंडाला काळे फासणाऱ्याला एक लाखाचे बक्षीस

**मराठा ठोक मोर्चा आक्रमक**

टिपू सुलतान याची छत्रपती शिवाजी महाराजांसोबत तुलना करणारे वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासमोरील अडचणी अधिक वाढण्याची शक्यता आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात मराठा ठोक मोर्चा आक्रमक झाल्याचे दिसून आले. हर्षवर्धन सपकाळ यांच्या तोंडाला काळे फासणाऱ्यास एक लाख रुपयाचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. मराठा ठोक मोर्चाचे सोलापुरातील समन्वयक महेश डोंगरे यांनी हे जाहीर केले.

### भाजपने 'ध' चा 'मा' केला - सपकाळ

"माझ्या वक्तव्याची मोडतोड करून "ध" चा "मा" करून देवेंद्र फडणवीसांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत असे मी सांगितले होते, त्याचा प्रत्यय आज पुण्यात आला. पुण्यातील भाजपाचे गुंड पुणे काँग्रेसच्या कार्यालयावर चाल करून आले व त्यांनी पोलिसांच्या उपस्थितीत दगडफेक करत काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्यांसह पत्रकार भगिनींवर प्राणघातक हल्ला केला. भाजपाच्या या गुंडगिरीचा आम्ही तीव्र निषेध करतो. पुणे पोलिसांनी दंगलखोर भाजपा गुंडाना चिथावणी देणाऱ्या धीरज घाटे आणि महापौर मंजुषा नागपुरे यांच्यासह भाजपाच्या दंगलखोरांवर तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली पाहिजे", असे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

### वादात ओवैसी यांचीही उडी



या वादात खासदार असदुद्दीन ओवैसी यांनीही उडी घेत भाजपावर जोरदार हल्लाबोल केला. "टिपू सुलतान इंग्रजांशी लढताना शहीद झाला. टिपू सुलतानने तुरुंगात बसून तुमच्या वीर सावरकरांसारखं इंग्रजांना लव्हलेटर लिहिली नाहीत. टिपू सुलतानने तलवार उचलली आणि इंग्रजांपासून आपला देश स्वतंत्र करण्यासाठी लढाईत शहीद झाला. इंग्रजांना टीपू सुलतानची एवढी भीती होती की दीड तास त्याचा मृतदेह पडून होता. इंग्रजांची फौज आजूबाजूला होती, पण तरीही त्याच्या मृतदेहाजवळ कोणीही जात नव्हते. कारण त्यांना देखील भीती होती की अचानक उठला तर काय?", असे असदुद्दीन ओवैसी यांनी म्हटले आहे. "टिपू सुलतानकडे जी सोन्याची अंगठी होती, त्या अंगठीवर राम लिहिलेलं होते. २०१४ मध्ये त्या अंगठीचा लिलाव देखील झाला. ही गोष्ट खोटी आहे का? डॉ.अब्दुल कलाम यांनी त्यांच्या 'विंग्स ऑफ फायर' या पुस्तकात लिहिलंय की रॉकेट टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून आपण टिपू सुलतानच्या स्वप्नांना पूर्ण करत आहोत. तुमच्यासाठी आणि आमच्यासाठी देखील डॉ.अब्दुल कलाम आदर्श आहेत. मग त्यांचे तरी ऐकले पाहिजे", असं असदुद्दीन ओवैसी यांनी म्हटले.







**महाशिवरात्रीच्या पवित्र दिवसाच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्र शिवभक्तीत तल्लीन झाला. 'बम बम भोले' आणि 'ॐ नमः शिवाय'च्या जयघोषाने राज्यातील ज्योतिर्लिंगांसह सर्व लहान-मोठी शिवमंदिरे दुमदुमून गेली आहेत. मुंबईच्या प्रसिद्ध बाबुलनाथ मंदिरातही दर्शनासाठी भक्तांनी गर्दी पहायला मिळाली. मुंबईच्या नवनिर्वाचित महापौर रितु तावडे यांनीही महादेवाची मनोभावे पूजा केली.**

**राज्यभरात एटीएसकडून धाडींचे सत्र**

## यवतमाळमध्ये १४ तर अहिल्यानगरमध्ये ७ ठिकाणी छापेमारी

**अहिल्यानगर, दि. १५ प्रतिनिधी**

राज्यभरात सध्या सुरु असलेल्या एटीएसच्या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली आहे. अशातच विदर्भातील यवतमाळमध्ये पुसद आणि उमरखेडमध्ये १४ ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. तर अहिल्यानगरमध्ये ७ ठिकाणी एटीएसचे छापे पडल्याची माहिती आहे. दहशतवादी संघटनांच्या संपर्कात राहून अनेक तरुणांना सक्रिय करण्याच्या हालचाली आढळल्यानंतर एटीएसने सर्च ऑपरेशन राबवले आहे. त्या अनुषंगाने अनेक भागात जवळपास २१ ठिकाणी एटीएसचे सकाळपासून सर्च ऑपरेशन सुरु असल्याची माहीती आहे. सोबतच या प्रकरणी अनेकांना ताब्यात घेऊन चौकशी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.


राज्यात काल रात्रीपासून अनेक भागात एटीएसची गोपनीय कारवाई सुरु आहे . विदर्भातही ४ ते ५ ठिकाणी एटीएस पथकाने कारवाई सुरू केली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आणि पुसद गावात एटीएस पथकाची काल रात्रीपासून कारवाई सुरु आहे. तर अकोला जिल्ह्यातील उरळ पोलीस स्टेशनअंतर्गत काही भागातही कारवाई सुरू आहे. एटीएसचे २० पथक हे रात्रीपासून उमरखेड आणि पुसद गावात तळ ठोकून आहे. एटीएस प्रमुख चंद्रकिशोर मीणा यांच्या नेतृत्वात विविध पथके तयार करण्यात आले असून राज्यात अनेक ठिकाणी काल रात्रीपासून हे पथके तळ ठोकून आहेत. एकट्या यवतमाळ जिल्ह्यात जवळपास एटीएस २० पथक दाखल आहे. या ठिकाणी स्थानिक पोलिसांसह आयपीएस अधिकारी देखील हजर आहे. त्यामुळे या कारवाईत नेमके काय घडते हे पाहणे महत्वचे ठरणार आहे.

अत्यंत गोपनीय पद्धतीनं राज्यातल्या अनेक ठिकाणी एटीएस पथकाकडून चौकशी सुरु आहे. स्थानिक घरांमध्ये जात लोकांकडून चौकशी केल्या जात आहे. मात्र कारवाईत पथकाने अद्यापपर्यंत कुणालाही ताब्यात घेतले नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. संभाव्य घातपाती कारवायांच्या पार्श्वभूमीवर एटीएससह तपास यंत्रणांनी काल मध्यरात्रीपासून राज्यात बहुतांश जिल्ह्यातीळ विविध परिसरात कारवाईला सुरुवात केली आहे. कारवाई सुरू असताना यावेळी मोठा बंदोबस्त ठेवला जात आहे.

# पुढच्या लोकसभेला माझ्या विरोधात उभे राहा श्रीकांत शिंदेंचे गणेश नाईकांना आव्हान

**ठाणे, दि. १५ प्रतिनिधी**





भाजपाचे नेते तथा वनमंत्री गणेश नाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका केली आहे. आमच्याच सरकारच्या नगरविकास खात्याने नवी मुंबईतील भूखंड बिल्डरांच्या घशात घालण्याचे काम केले आहे, असा गंभीर आरोप नाईक यांनी केला आहे. गप्प राहण्यासाठी मी मंत्रिपद स्वीकारलेले नाही. नवी मुंबईकरांचे भूखंड परत करा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शिंदे गटाचे नेते गणेश नाईक यांच्यावर टीका करत आहेत. असे असतानाच आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव तथा खासदार श्रीकांत शिंदे यांनी गणेश नाईक यांच्यावर पलटवार केला आहे.

यांच्या घरामध्येच दोन मुलं आणि स्वत: माजी झालेले आहेत. त्यांनी मला किंवा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना माजी करण्याची भाषा करू नये. त्यांना स्मृतीभ्रंश झाला आहे. त्याला इंग्रजीमध्ये डिमेन्शिया असे म्हणतात. त्यांना या सर्व गोष्टींचा विसर पडलेला असेल आणि त्यांना जास्त खुमखुमी असेल तर त्यांनी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत उभे राहावे, असा जोरदार पलटवार श्रीकांत शिंदे यांनी केला. तसेच गणेश नाईक यांनी कल्याण किंवा ठाणे या कोणत्याही लोकसभा मतदारसंघातून उभे राहावे. त्यांना खुलं आव्हान आहे. त्यांनी जिथे उभे राहायचे आहे तिथे राहावे. डॉक्टर श्रीकांत शिंदे तुमच्या विरोधात उभा राहील, असे खुले आव्हानही श्रीकांत शिंदे यांनी गणेश नाईक यांना दिले. त्यानंतर आता नाईक नेमकं काय उत्तर देणार आहेत, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

गणेश नाईक एका बैठकीत बोलत होते. यावेळी बोलत असताना त्यांनी हॉस्पिटलसाठी, बागेसाठी, शाळेसाठी भूखंड दिले गेले नाहीत. हे भूखंड बिल्डरांच्या घशात त्यांच्या दलालांनी घातले. मी ज्या मंत्रिमंडळात आहे, त्याच मंत्रिमंडळातील नगरविकास खात्याच्या लोकांनी अशा प्रकारचा कर्मदरिद्रीपणा केला. मी म्हणूनच सीडको, एमआयडीसीकडून जनतेच्या हितासाठी नवी मुंबई महापालिकेला जे भूखंड देण्यात आलेले आहेत, ते लगेच देण्याची व्यवस्था करावा. मी पक्षाच्या शिस्तीचा भक्त आहे. पण ज्या गोष्टीसाठी मी आमदार, मंत्री झालो, तेच बोलू शकलो नाही तर ते मंत्रिपद काय चाटायचे आहे का? अशी उद्विग्नताही त्यांनी व्यक्त केली.

## सातारा झेडपीचा अध्यक्ष भाजपचाच होणार- गोरे



**सातारा, दि. १५ प्रतिनिधी**

सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत स्वतंत्र लढलेल्या भारतीय जनता पक्षाला २७जागांपर्यंतच मजल गाठता आलेली आहे. विरोधात लढलेल्या राष्ट्रवादी आणि शिवसेना आघाडीने ३५ जागा जिंकल्या आहेत, त्यामुळे त्यांनी झेडपीत सत्ता स्थापनेसाठी हालचाली सुरू केल्या आहेत. मात्र, आता भाजपनेही डाव टाकला असून सातारा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा भाजपचाच होणार, त्यासाठी आम्ही सगळे प्रयत्न करू, असे विधान राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरेंनी केले आहे, त्यामुळे साताऱ्यात सत्तासंघर्ष तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

सातारा जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांच्या सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्या सोहळ्यात बोलताना 'सातारा जिल्हा परिषदेत भारतीय जनता पक्षाचा अध्यक्ष बसण्यासाठी आम्ही सगळे मिळून सामुदायिक प्रयत्न करू, असे मी सगळ्यांना आश्वस्त करतो,' असेही जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले.

सातारा जिल्हा परिषदेच्या ६५ जागांपैकी सर्वाधिक २७ जागा ह्या भारतीय जनता पक्षाने जिंकल्या आहेत, तर दोन नंबरला २० जागा जिंकून राष्ट्रवादी काँग्रेस आहे. शिवसेनेला १५ जागा मिळाल्या आहेत. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणूकपूर्व आघाडी केली होती, त्यामुळे या आघाडीकडे बहुमत आहे. पण महायुती म्हणून भाजपच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यावर ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सातारा भाजपची भूमिका स्पष्ट केली आहे.

जयकुमार गोरे म्हणाले, मी खात्रीने सांगतो, सातारा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा भारतीय जनता पक्षाचाच होणार. त्यासाठी आम्ही सगळे प्रयत्न करू. नेतृत्व म्हणून नेतृत्व प्रयत्न करेल. त्यामुळे कोणी असे समजायचे कारण नाही की, आमच्या जागा कमी आल्या म्हणून अध्यक्ष आमचा होणार नाही. आम्हाला अपेक्षित यश मिळाले नाही, म्हणून आम्ही प्रयत्न सोडणार, असेही होणार नाही.

## टीम इंडियाच्या रणरागिणींचा बँकॉकमध्ये डंका

**भारताचा पाकिस्तानवर ८ विकेट्स राखून दणदणीत विजय**




**बँकॉक, दि. १५ प्रतिनिधी**

'वुमेन्स एशिया कप रायझिंग स्टार्स' स्पर्धेत भारतीय महिला 'अ' संघाने आपली विजयी घोडदौड कायम राखत कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ८ गडी राखून पराभव केला आहे. १५ फेब्रुवारी रोजी बँकॉक येथे पार पडलेल्या या अटीतटीच्या सामन्यात भारताने गोलंदाजी आणि फलंदाजी अशा दोन्ही आघाड्यांवर वर्चस्व गाजवत पाकिस्तानला अक्षरशः धूळ चारली. भारताच्या या विजयात वृंदा दिनेशची वादळी खेळी आणि गोलंदाजांचा अचूक टप्प्यावरचा मारा निर्णायक ठरला.

टॉस जिंकून प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या पाकिस्तानी संघाला भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच जेरीस आणले. भारतीय गोलंदाजीच्या धारदार माऱ्यापुढे पाकिस्तानचा डाव १८.५ षटकांत अवघ्या ९३ धावांत आटोपला. कर्णधार राधा यादवने आपल्या फिरकीच्या जाळ्यात पाक फलंदाजांना अडकवत ३ षटकांत फक्त ११ धावा देऊन ३ बळी टिपले. तिला मोलाची साथ देताना प्रेमा रावत आणि सायमा ठाकोर यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. पाकिस्तानचे तब्बल ८ फलंदाज दुहेरी धावसंख्याही गाठू शकले नाहीत.

## इशान किशनने रचला नवा इतिहास!

**कोलंबो, दि. १५ वृत्तसंस्था**



टी-२० विश्वचषक २०२६ मधील सर्वात मोठ्या महामुकाबल्यात भारताच्या इशान किशनने आपल्या बॅटने मैदानात आग ओकली आहे. पाकिस्तानविरुद्धच्या हाय-व्होल्टेज सामन्यात इशानने केवळ चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडत टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील पाकिस्तानविरुद्धचे सर्वात जलद अर्धशतक ठोकण्याचा पराक्रम केला आहे. इशानच्या या आक्रमक खेळीमुळे पाकिस्तानचे गोलंदाज पूर्णपणे हतबल झाल्याचे पाहायला मिळाले. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारतीय संघाला इशान किशनने स्फोटक सुरुवात करून दिली. त्याने पाकिस्तानी वेगवान गोलंदाजांचा समाचार घेत मैदानाच्या चहूबाजूंना फटकेबाजी केली. इशानने आपले अर्धशतक अवघ्या २७ चेंडूत पूर्ण केले, ज्यामुळे तो पाकिस्तानविरुद्ध विश्वचषकात सर्वात वेगाने ५० धावा करणारा पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे. इशानच्या या खळीच्या मदतीने भारताने पाकिस्तानसमोत १७६ धावांचे लक्ष्य ठेवले.

## कोणत्याही मंचावर या, चर्चेस तयार...

**शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर शाहांचे राहुल गांधींना खुले आव्हान**

**अहमदाबाद, दि. १५ वृत्तसंस्था**



गुजरात दौऱ्यावर असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून जोरदार टीका केली. काँग्रेस आणि तिचे नेतृत्व नेहमीच जनतेला दिशाभूल करत असल्याचा आरोप करत शाह यांनी म्हटले की, मोदी सरकारने व्यापार करारांमध्येही शेतकरी आणि डेअरी क्षेत्राचे हित सुरक्षित ठेवले आहे, काँग्रेस केवळ चुकीची माहिती पसरवत आहे.

अमित शाह म्हणाले की, संसदेत राहुल गांधी शेतकऱ्यांच्या हिताची भाषा करतात, मात्र त्यांनी हेही सांगायला हवे की, मनमोहन सिंग सरकारच्या १० वर्षांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांकडून किती धान्य खरेदी करण्यात आले आणि नरेंद्र मोदी सरकारच्या १० वर्षात किती धान्य खरेदी झाले. शाह यांच्या दाव्यानुसार, सध्याच्या सरकारने काँग्रेसच्या तुलनेत १५ पट अधिक धान्य खरेदी केली आहे, मात्र ही बाब राहुल गांधींना दिसत नाही.

गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले की, काँग्रेस सरकारच्या काळात शेतकऱ्यांसाठीचे बजेट फक्त २६ हजार कोटी रुपये होते, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तो १ लाख २९ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आले. हेच शेतकऱ्यांप्रती सरकारच्या बांधिलकीचे उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

अमित शाह यांनी राहुल गांधींना खुले आव्हान देत म्हटले की, कोणत्याही मंचावर या, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचा अध्यक्ष शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर त्यांच्याशी चर्चेसाठी तयार आहे. खरंतर शेतकऱ्यांचे नुकसान कोणी केले, यावर उघड चर्चा व्हावी, कारण मोदी सरकारने प्रत्येक करारात शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे, असे शाहांनी म्हटले.

## कोकणात भाजपने माजी नगराध्यक्षासह चौघांची केली पक्षातून हकालपट्टी

**चिपळूण, दि. १५ प्रतिनिधी**

पालिकेच्या निवडणुकीनंतर आता समित्यांचे वाटप देखील झाले आहे. दरम्यान आता निवडणुकीत पक्षविरोधी कारवाया केल्याप्रकरणी भाजपने कारवाईचा धडाकाच सुरू केला आहे. पुण्यात एकाच वेळी ६९ जणांना बाहेरचा रस्ता दाखवल्यानंतर आता प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आपला मोर्चा कोकणाकडे वळवला आहे. चिपळूण पालिकेच्या निवडणुकीत पक्षविरोधी कारवाया केल्याप्रकरणी माजी नगराध्यक्षासह चौघांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. या कारवाईने आता कोकणातील भाजपमध्ये खळबळ उडाली आहे.

चिपळूण पालिकेची दोन महिन्यापूर्वी निवडणूक झाली. त्यात परिमल भोसले यांनी पक्षाचा आदेश धुडकावून अपक्ष निवडणूक लढवली म्हणून त्यांच्यासह सुधीर पानकर यांचे निलंबन करण्यात आले आहे. तसेच सुरेखा खेराडे आणि श्रीराम शिंदे यांनी पक्षाच्या विरोधात काम केल्यामुळे त्यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. चिपळूण शहराच्या नगराध्यक्ष म्हणून सुरेखा खेराडे यांनी २०१७ पासून पुढील पाच वर्ष काम केले आहे.

भाजपच्या तिकिटावर थेट जनतेतून निवडून आलेल्या नगराध्यक्षांपैकी त्या होत्या. तसेच भाजपच्या पहिल्या नगराध्यक्षा म्हणून त्यांना मान मिळाला होता. पालिकेत कामकाज करताना त्यांना संघर्षाला सामोरे जावे लागले होते. उत्तर रत्नागिरी जिल्हा भाजपच्या महिला जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली होती. परंतु नुकतेच झालेल्या निवडणुकीत त्यांनी पक्षविरोधी काम केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. परिमल भोसले यांना भाजपकडून स्वीकृत सदस्य म्हणून पालिकेत काम करण्याची संधी मिळाली होती. श्रीराम शिंदे भाजपचे शहर मंडळ अध्यक्ष तर सुधीर पानकर रिक्षा संघटनेचे अध्यक्ष होते.

# रोहा तालुक्याचे लोकवैभव भाईसाहेब पाशिलकर यांची दीर्घ आजाराशी अखेर झुंज संपली

**रोहा प्रतिनिधी ।**
रायगडच्या राजकारणातील एक झंझावाती नेतृत्व, शब्दाला जागणारा लोकनेता आणि सर्वसामान्यांच्या अडीअडचणीला धावून जाणारे व्यक्तिमत्व, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती भाईसाहेब पाशिलकर यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. शनिवार रात्री १०:३० वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने जिल्ह्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील एका मोठ्या पर्वाचा अंत झाला असून
राजकारणातील 'धगधगती तोफ' शांत झाली आहे.



भाईसाहेब पाशिलकर म्हणजे रोहा तालुक्याच्या राजकारणातील एक अभेद्य किल्ला होते. आपल्या रोखठोक भाषणांनी आणि प्रशासनावर असलेल्या जबरदस्त पकडीमुळे त्यांनी 'धगधगती तोफ' अशी ओळख निर्माण केली होती. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात विकासकामांचा डोंगर उभा केला. केवळ सत्ताकारण न करता समाजकारण आणि लोकसंग्रह कसा करावा, याचा वस्तुपाठच त्यांनी नव्या पिढीसमोर ठेवला. तटकरे कुटुंबाची प्रत्येक राजकीय घडामोड भाईंच्या आशिर्वाद आणि मार्गदर्शनाखेरिज पुर्ण होत नव्हती. भाईसाहेबांच्या जाण्याने पाशिलकर कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. धाटाव आणि रोहा तालुक्यातील जनतेसाठी ते केवळ नेते नसून एक आधारवड होते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच संपूर्ण जिल्ह्यातून हळहळ व्यक्त झाली.
रविवारी महाशिवरात्रीचा दिवस असतानाही हजारोंच्या संख्येने लोकांनी भाईंच्या अंतिम दर्शनासाठी त्यांच्या निवासस्थानी गर्दी केलेली, धाटाव येथील वैकुंठधाम स्मशानभूमीत दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरेंनी त्यांना श्रद्धांजली वाहिली, यावेळी माजी आम. अनिकेत तटकरे, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष मधुकर पाटील यांच्यासह सर्वपक्षीय नेतेमंडळी उपस्थित होते.

# रिक्षा चालकांची खुलेआम दंडेलशाही-प्रवाशांची रोजची लूट

**अलिबाग प्रतिनिधी ।**
रायगड जिल्ह्यात विशेषतः अलिबाग परिसरात रिक्षा प्रवास म्हणजे सेवा नसून सक्तीची वसुली झाली आहे. शासनाने ठरवलेले किमान भाडे ₹23 असताना तीन आसनी रिक्षा थेट ₹30 पासून सुरू होतात आणि पुढे चालक सांगेल तेवढे ₹40-50 आकारले जाते. सहा आसनी रिक्षा तर दहा प्रवासी भरल्याशिवाय सुटत नाहीत. दररोज शेकडो प्रवासी या उघड लुटीचे बळी ठरत असताना ना पोलीस कारवाई करतात ना आरटीओ आणि याच पार्श्वभूमीवर निवृत्त प्राध्यापक व जिल्हा ग्राहक संरक्षण समितीचे माजी सदस्य शाम जोगळेकर यांनी प्रशासनावर थेट प्रश्न उपस्थित केले आहेत.
अलिबाग एसटी स्टँडवरील पेपर स्टॉलजवळ सुरक्षा सप्ताहानिमित्त उपप्रादेशिक परिवहन विभागाचा फलक लावण्यात आला आहे. त्यावर "मुलांना गाडी चालवू देऊ नका" अशा सूचना दिल्या आहेत; मात्र खाली फक्त "उपप्रादेशिक परिवहन विभाग, पेण" एवढाच उल्लेख असून फोन नंबर, पत्ता किंवा तक्रार नोंदविण्याची कोणतीही माहिती नाही. नियम मोडल्यास नागरिकांनी नेमके कुठे तक्रार करायची हा मूलभूत प्रश्न अनुत्तरित आहे.
अपघात वर्षभर होत असताना सुरक्षा सप्ताह फक्त वर्षातून एकदाच का, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. सप्ताह संपल्यानंतर अंमलबजावणी संपते का, तसेच कारवाईची जबाबदारी पोलीस की आरटीओ यावर दोन्ही विभागांत ढकलाढकली सुरू असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. प्रत्यक्षात मात्र रस्त्यावर कोणताही परिणाम दिसत नाही.

# तळा बाजारपेठेत ओल्या काजुगरांची आवक वाढली काजूगर विक्रीतून आदिवासींचा उदरनिर्वाह

**तळा प्रतिनिधी ।**
तळा बाजारपेठेत ओले काजूगर विक्रीसाठी दाखल झाले असून जवळपास २०० ते २५० रुपयांपर्यंत शेकडा भावाने या कजुगरांची विक्री करण्यात येत आहे. तालुक्यातील आदिवासी समाज हा जंगलातील रानमेवा विकून आपला व कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवितो.फेब्रुवारी ते मे महिन्याच्या अखेरीस पर्यंत तालुक्यातील आदिवासी बांधव काजूगर,आंबे,फणस, करवंद,जांभूळ,आदी रानमेवा विकून मिळालेल्या पैशांवर आपला उदरनिर्वाह करतात. तळा बाजारपेठेत सध्या काजूगर ला मोठी मागणी असून यावर्षी ग्राहक २०० ते



२५० रु.शेकड्याने काजूगर खरेदी करताना दिसत आहेत. आदिवासी बांधव दिवसभर उंच काटीच्या(आकोटी) सहाय्याने जंगलात ओल्या बिया काढून सायंकाळी घरी घेऊन येतात. दोन दिवस बियांची साठवणूक केल्यावर या बियांमधून अखंड गर काढण्यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागते व नंतर या बिया बाजारात विक्रीसाठी आणल्या जातात. तळा बाजारपेठेत या ओल्या काजुगरांना मोठी मागणी असल्याने अवघ्या काही तासातच या बिया विकल्या जातात.हे काजूगर जवळपास पाऊस सुरू होईपर्यंत मिळत असल्याने गोरगरीब आदिवासी बांधवांच्या हाताला काम व पोटाची खळगी भरण्यास आधार मिळतो.

# रायगड मध्ये महाशिवरात्रीनिमित्ताने 'हर हर महादेव'चा गजर
## अभिषेक, पूजा-अर्चेसह धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**अलिबाग प्रतिनिधी ।**
रायगड जिल्ह्यात रविवारी महाशिवरात्रीनिमित्ताने 'हर हर महादेव'चा गजर घुमला. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शिवमंदिरात गर्दी पाहायला मिळाली. अनेक ठिकाणी मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यावर्षी महाशिवरात्र रविवारी असल्याने शनिवार पासूनच चाकरमानी आले होते.
अलिबाग शहरातील प्रती काशी म्हणून ओळखले जाणारे काशी विश्वेश्वर मंदिर, गोकुळेश्वर येथील शिवमंदिर, तालुक्यातील चौल रामेश्वर, मापगाव येथील कनकेश्वर, नारंगी भुवनेश्वर आदी ठिकाणी भक्तांनी महादेवाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. हर हर महादेवचा गजर करीत अनेक ठिकाणी धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचे



आयोजन केले होते.
अलिबाग तालुक्यातील श्रीक्षेत्र कनकेश्वर येथे महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, तसेच सायंकाळी पालखी सोहळा साजरा झाला. तसेच रात्री उशिरापर्यंत भाविकांची गर्दी लक्षणीय होती.
श्रीवर्धन तालुक्यातील श्रीक्षेत्र हरिहरेश्वर येथील महाशिवरात्रीनिमित्त पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत तालुक्यातील उल्हास, चिल्लार, पेज या तीन नद्यांच्या संगमावर असलेल्या कोल्हारे येथील श्री क्षेत्र संगमेश्वर येथे दर्शनासाठी हजारो शिवभक्त उपस्थित होते. मंदिरात दिव्यांची रोषणाई करण्यात आली होती. दिवसभर भजन, कीर्तन, प्रवचन तसेच विविध सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पुरातन तमनाथ तसेच पोसरी येथील तलावात असलेले शिवमंदिर येथे अनेक कार्यक्रम आयोजित केले आहेत.

# राग, अहंकार वं मत्सर या तीन गोष्टी शरीराला अपयकारक आहेत ! -- गुरु माऊली त्रिशाताई

**मुरुड जंजिरा प्रतिनिधी ।**
महाशिवरात्री निमित्त मुरुड येथील श्री स्वामी समर्थ डोंगरी मठाधिपती गुरुमाऊली सौ त्रिशा दत्तात्रेय पाटील यांच्या मठा तर्फे विशाल समुद्रकिनारी महासागराच्या साक्षीने श्रीशिव पूजन, नामस्मरण व रुद्राभिषेक करण्यात आला. यावेळी मोठया संख्येने स्वामी परिवारातील सदस्य उपस्थित होते. त्यानिमित्त गुरुमाऊली सौ. त्रिशाताईनी अतिशय भक्तीपूर्ण अध्यात्मिक मार्गदर्शन केले. महाशिवरात्री चे महत्व पटवून देताना माऊली म्हणतात आपल्या जीवनामध्ये तीन गोष्टींचा त्याग आपण केला पाहिजे. त्या म्हणजे राग,अहंकार आणि मत्सर . येणाऱ्या काळामध्ये नव्या पिढीने व सर्वांनीच पॅक फूड व बाहेरील पदार्थ खाऊ नयेत, कारण कॅन्सर, मधुमेह व उच्च रक्तदाब याचे मूळ कारण पॅकेज फूड मध्ये आहे. आपल्या वाणिमध्ये गोडवा निर्माण करा, सर्वांना प्रेम द्या. गुरुमाऊलिंकडून सर्वांना मेडिटेशन कसे करावे



व या धकाधकीच्या जिवनात मेडिटेशन का आवश्यक आहे याची माहीती देण्यात आली. महाशिवरात्रीच्या या पावन दिवशी शिवस्तुती व नमः शिवाय चा जप करून भक्तिमय वातावरणात महाशिवरात्रीचा दिवस साजरा करण्यात आला. महाआरती नंतर सर्वांना प्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वामीपरिवाराकडून सहकार्य करण्यात आले.
सकाळी ६ वाजता मुरुड समुद्रकिनारी शिबिराला सुरवात झाली .प्रथम आनंदात उत्सहात माऊली त्रिशताईंचे आगमन झाले .स्वामी प्रतिमेचे विधीवत पूजन करण्यात आले .नंतर त्रिशताईंनी ध्यान करून मन स्थिर करण्यास सांगून शंकर पिंडीचे पूजन केले ,नंतर ३० मिनिटे स्वामी स्मरण करण्यात आले .सर्व स्वामीभक्तांना शंकर पिंडीचे पूजन करण्याचे संधी मिळाली
स्वामी पूजेनंतर महाआरती घेण्यात आली .समुद्र दर्शन करून पूजेचे विसर्जन करण्यात आले .आलेल्या भक्तांना महाप्रसाद देऊन घरी जायला सांगितले .आजचा दिवस महत्वाचा असल्याने पूर्ण दिवस स्वामी स्मरणात राहावे असे त्रिशाताई यांनी सांगितले कार्यक्रम सुंदर नियोजन करण्यासाठी स्वतः त्रिशाताई यांच्या सोबत त्यांचे पती डॉ दत्तात्रय पाटील ,व स्वामीभक्तांनी सहकार्य केले होते. सदरच्या कार्यक्रमासाठी असंख्य स्वामी भक्त मोठ्या संखेने उपस्थित होते.

# रोहा अष्टमी येथे हरिनाम यज्ञ व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण संपन्न

**रोहा प्रतिनिधी ।**
रोहा तालुक्यातील अष्टमी येथील मराठा आळी परिसरातील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर येथे मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त हरिनाम यज्ञ व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाले.



स्वानंद सुखनिवासी सद्गुरू अलिबागकर महाराज व वै.ह.भ.प. गुरुवर्य गोपाळबाबा वाजे महाराज यांच्या कृपाछत्राखाली तसेच पंढरपूरचे मठाधिपती ह.भ.प. गुरुवर्य नारायण महाराज वाजे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. रोहाचे ह.भ.प. शेळके महाराज यांच्या नेतृत्वात कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.
शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे काकड आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर अभिषेक व पूजन, कळस पूजन, ध्वजारोहण आणि ज्ञानेश्वरी पूजन पार पडले. दिवसभर ज्ञानेश्वरी वाचन, हरिपाठ, प्रवचन व कीर्तनांनी परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. शनिवार दि. १४ फेब्रुवारी रोजी काल्याचे कीर्तन व सांगता सोहळा संपन्न झाला. महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला.
या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, नगरसेवक महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, प्रशांत कडू तसेच नगरसेविका नीता हजारे व इतर मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# कामोठे सेक्टर 17 मध्ये अतिक्रमणावर कारवाई
## पनवेल मनपा प्रशासन ॲक्शन मोडवर; दोन तासांत उचलला बडगा

**कामोठे प्रतिनिधी ।**
सेक्टर १७ मधील जय गुरुदेव कॉम्प्लेक्ससमोर गेल्या अनेक वर्षांपासून अनधिकृतपणे सुरू असलेल्या मटन-चिकनच्या दुकानावर पनवेल महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने तात्काळ कारवाई केली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार अवघ्या दोन तासांत ही कारवाई करण्यात आल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.
स्थानिक रहिवाशांच्या मते, संबंधित दुकान गेली सुमारे आठ वर्षे बिनपरवानगी सुरू होते. उघड्यावर कोंबड्या व बकऱ्या कापल्या जात असल्याने दुर्गंधीचा त्रास सोसायट्यांपर्यंत पोहोचत होता. अनेक वेळा तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांत होती. कारवाईचा प्रयत्न झाला की संबंधित व्यावसायिक स्थानिक नगरसेवकाचे नाव पुढे करून दबाव टाकत असल्याचा आरोपही रहिवाशांनी केला आहे.
सोसायटीतील काही सदस्यांनी याबाबतची माहिती आणि छायाचित्रे थेट मनपाकडे पाठवली. त्यानंतर अतिक्रमण विभागाने तातडीने पथक पाठवून संबंधित अनधिकृत स्टॉल हटवला. "दोन तासांच्या आत कारवाई होणे ही पहिलीच घटना असून प्रशासनाने सकारात्मक दखल घेतली," असे नागरिकांनी सांगितले. या कारवाईबद्दल सोसायटीतर्फे पनवेल महानगरपालिकेचे आभार मानण्यात आले असून, कामोठे परिसरातील इतर ठिकाणच्या अतिक्रमणांवरही अशीच कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे.

# पाली शासकीय विश्रामगृहात शिक्षक आमदार संवाद
## आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्यासमोर संच मान्यता
### पगार, पेन्शन व अनुदान प्रश्नांवर थेट चर्चा

**सुधागड–पाली प्रतिनिधी ।**
पाली येथील शासकीय विश्रामगृहात आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी शिक्षकांच्या अडचणी समजून घेण्यासाठी नुकतीच बैठक घेतली. या बैठकीत कोकणातील अनुदानित माध्यमिक शाळांवरील संच मान्यतेचा शासन निर्णय, शिक्षकांचे पगार, जुनी पेन्शन योजना, टप्पा अनुदान तसेच पे युनिटमार्फत अडकणाऱ्या थकीत बिलांबाबत शिक्षकांनी थेट व स्पष्ट चर्चा केली. संघटनेचे अध्यक्ष दिलीप म्हसे, जिल्हा सचिव विनोद डाकी तसेच संपर्कप्रमुख एल.एल. ठाकरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.
शिक्षकांनी निदर्शनास आणून दिले की, १५ मार्च २०२४ रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने काढलेल्या संच मान्यतेसंदर्भातील शासन निर्णयामुळे कोकणातील अनेक शाळांवर अस्तित्वाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



कमी पटसंख्येच्या शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असून शासनाने निकष ठरवताना डोंगराळ भौगोलिक परिस्थिती, दुर्गम ग्रामीण भाग आणि घटती लोकसंख्या यांचा विचार केलेला नाही, अशी तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. रत्नागिरी जिल्ह्यातील तब्बल ५७ शाळा बंद पडण्याची शक्यता असून नववी–दहावीचे १०१ वर्ग कमी होण्याचा धोका आहे. पुढील शैक्षणिक वर्षात ही परिस्थिती आणखी गंभीर होईल, असा इशाराही शिक्षकांनी दिला.
शिक्षकांनी मागणी केली की, ८ जानेवारी २०१६ च्या शासन निर्णयानुसार नववी–दहावीकरिता इंग्रजी, गणित, विज्ञान व समाजशास्त्र विषयांचे किमान शिक्षक आवश्यक असल्याची तरतूद कायम ठेवावी. केवळ विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षक मंजुरी दिल्यास शैक्षणिक दर्जा घसरू शकतो, तसेच ग्रामीण भागातील अनेक शाळा 'शून्य शिक्षक' स्थितीकडे जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली. त्यामुळे कोकणासाठी स्वतंत्र संच मान्यतेचे निकष ठरवून पूर्वीप्रमाणे तुकडीआधारित शिक्षक संच मान्यता देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

# कडाव एसटी बस थांब्यावर अतिक्रमणाचा धक्कादायक प्रकार

**कर्जत प्रतिनिधी ।**
कडाव गावातील एसटी महामंडळाच्या शासकीय प्रवाशी बस थांब्याच्या जागेवर पुन्हा एकदा अनधिकृत टपरी उभी करण्यात आल्याचा प्रकार समोर आला असून, त्यामुळे ग्रामपंचायत व एसटी प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.
सुमारे दहा ते बारा वर्षांपूर्वी कडाव गावातील एसटी महामंडळाचा अधिकृत बस थांबा तोडून त्या ठिकाणी अनधिकृत दुकानांचे गाळे उभारण्यात आले होते. परिणामी शालेय विद्यार्थी, महिला, वयोवृद्ध नागरिक तसेच भाविक भक्त यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत होते.सदर अनधिकृत बांधकाम हटवून त्या ठिकाणी पुन्हा शासकीय एसटी बस थांबा उभारण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गंगावणे यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला. कोरोना महामारीच्या काळात हा पाठपुरावा काही काळ स्थगित झाला होता. मात्र, महामारी संपल्यानंतर त्यांनी पुन्हा या विषयावर पाठपुरावा सुरू केला. त्यांच्या या लढ्याला कर्जत प्रेस असोसिएशन व कर्जत प्रेस क्लब यांची साथ लाभली. दि. २४ जुलै २०२५ रोजी कडाव ग्रामपंचायतीच्या आवारात तालुक्यातील पत्रकारांनी लाक्षणिक उपोषण करून प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर दि. २६ जुलै २०२५ रोजी पोलीस बंदोबस्तात बसथांब्यावरील अनधिकृत बांधकाम हटवण्यात आले.यानंतर एसटी महामंडळाने कडाव येथे सुसज्ज प्रवाशी बस थांबा उभारण्यासाठी सुमारे २१,१३,०७८ रुपये खर्चाचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला असल्याची माहिती मिळाली आहे.
मात्र, हे बांधकाम हटवून काही महिन्यांतच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विनोद काशिनाथ पवाळी यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या आचारसंहितेचा गैरफायदा घेत मध्यरात्रीच्या सुमारास पुन्हा त्याच जागेत टपरी उभी करण्याचा प्रयत्न केला आहे.
या प्रकारामुळे ग्रामपंचायत, एसटी महामंडळ तसेच न्यायव्यवस्थेचा अवमान झाल्याची भावना व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गंगावणे यांनी संबंधित टपरी तात्काळ हटवून भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांन्वये कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# पनवेल महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान 2026 उत्साहात

**पनवेल प्रतिनिधी ।**
पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान २०२६ यशस्वीरीत्या राबविण्यात आले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हे अभियान आयोजित करण्यात आले. या अभियानांतर्गत मॅरेथॉन व विविध खेळांचे आयोजन करण्यात आले.
या अभियानाचा एक भाग म्हणून दिनांक ०३ फेब्रुवारी रोजी सकाळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्र. ५ ते सेंट्रल पार्क या मार्गावर जनजागृती मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. या मॅरेथॉनमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.
"भेदभाव समाप्त करूया, सन्मानाची वागणूक देऊया" हा संदेश देत कुष्ठरोगाबाबत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी आणि रुग्णांना समाजात सन्मानाने वागणूक मिळावी यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गतच स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात आले. तसेच 'कुष्ठमुक्त महाराष्ट्र (कुसुम)' विशेष सर्वेक्षण मोहिमेद्वारे शहरात सक्रिय रुग्ण शोध मोहिमही हाती घेण्यात आली आहे.
उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांच्या सूचनेनुसार व मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी यांच्या नेतृत्वाखाली या अभियानांतर्गत बॅडमिंटन ,खोखो, बुद्धीबळ, कबड्डी, क्रिकेट, लंगडी, संगीत खुर्ची, कॅरम, रांगोळी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.कुष्ठरोग जनजागृती व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुप्त गुणांना वाव असा दुहेरी समन्वय या अभियानाच्या माध्यमातून साकारण्यात आला. याचबरोबर विविध शाळांमध्येही निबंध स्पर्धा व रॅलीचे आयोजन करण्यात आले.
या अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा व मॅरेथॉन यशस्वी करण्यासाठी शहर क्षयरोग व कुष्ठरोग अधिकारी डॉ.उषा राठोड यांच्या समवेत डॉ.गणेश नायर, डॉ.भक्तराज भोईटे, डॉ.मनिषा चांडक, डॉ.सुरेश पंडित, डॉ.आकाश ठसाळ यांचे सहकार्य लाभले.

# रायगड जिल्हा परिषद सत्ता संघर्ष टोकाला
## भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य गोवा भ्रमंतीवर?

**अलिबाग प्रतिनिधी ।**
रायगड जिल्हा परिषदेवर सत्ता स्थापनेसाठी राजकीय घडामोडींना वेग आला असतांनाच, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनिर्वाचीत सदस्य गोवा भ्रमंतीवर गेल्याची चर्चा आहे. शिवसेना शिंदे गटाकडून सत्तेत सहभागासाठी राजकीय दबाव टाकण्यास सुरुवात झाल्याने, दोन्ही पक्षांनी आपल्या सर्व सदस्यांना गोव्यात नेल्याचे खात्रीलायक सुत्रांकडून सांगीतले जात आहे.
नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे २१, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट १६, भाजप १५, शिवसेना उध्दव ठाकरे गट ५ आणि काँग्रेसचे दोन सदस्य निवडून आले आहेत. त्यामुळे कुठल्याही एका पक्षाला बहुमत मिळू शकलेले नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेवर सत्ता स्थापनेसाठी युती आघाडीची अपरिहार्यता कायम आहे. यातून सदस्य पळवापळवी आणि पक्षफोडाफोडीची शक्यता असल्याने, राजकीय पक्षांकडून विशेष खबरदारी घेतली झात आहे.
भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने स्वतंत्ररित्या आपले गट स्थापन केले आहे. यानंतर सर्व सदस्यांना घेऊन दोन्ही पक्षाचे पदाधिकारी गोवा येथे भ्रमंतीसाठी रवाना झाल्याचे खात्रीशीर वृत्त आहे. गोव्यातील एका तारांकीत हॉटेल मध्ये सध्या दोन्ही पक्षांचा मुक्काम असून, सत्ता स्थापनेच्या वाटाघाटी गोव्यातूनच सुरू असल्याची चर्चा आहे. शिवसेना शिंदे गटाला बाजूला ठेऊन जिल्हा परिषदेवर सत्ता स्थापन करण्याचा दोन्ही पक्षांचा प्रयत्न आहे.

# 50% कर सवलत अभियान ग्रामपंचायतींमध्ये अडकला; शासननिर्णय खुंटीला! ग्रामस्थांच्या आशेवर पाणी

**श्रीवर्धन प्रतिनिधी**
महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या " मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान" अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अभियानांपैकी गावातील गोरगरीबांची थकीत घरपट्टी-पाणीपट्टी व अन्य कर यामध्ये ५०% सूट देऊन वसुली करावी असे शासनाचे आदेश असताना तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये शासननिर्णयाला खुंटीला लावण्यात आले असल्याचे समजते मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची अंमलबजावणी जाणीवपूर्वक रखडवली आहे असा प्रश्न निर्माण होत आहे.
गावातील कष्टकरी, शेतमजूर, लहान दुकानदार आणि आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबांसाठी शासनाने दिलेली ५०% कर सवलत ही मोठा दिलासा ठरणार होती. पण प्रत्यक्षात अनेक ग्रामपंचायतींमध्ये अभियान अजून कागदावरच अडकला आहे.
विशेष ग्रामसभा न घेणे आणि ठराव न करणे यामुळे पात्र नागरिकांना दिलासा मिळत नाही. गावातील लोकांमध्ये आता प्रश्न निर्माण झाला आहे "शासन योजनेमार्फत अभियान जाहीर करते, पण ती आमच्यापर्यंत पोहोचते कधी?"
गावपातळीवर आर्थिक संकटात असलेल्या कुटुंबांसाठी ही सवलत जीवनरेखा ठरू शकली असती. मात्र प्रशासनातील ढिलाईमुळे ही मदत कागदावरच राहिल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.
" BDO यांनी ग्रामपंचायतींना लेखी आदेश द्यावेत ग्रामसभा घेऊन ठराव करावेत आणि आम्हाला मिळणारा हक्काचा दिलासा द्यावा."
नाहीतर "समृद्ध पंचायत" हे नाव गावकऱ्यांसाठी केवळ पोस्टरवरील शब्द ठरेल.

"मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सर्व ग्रामपंचायतींमध्ये राबविण्यात येत असून काही ग्रामपंचायतींनी त्यात चांगली कामगिरी केली आहे. मात्र सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी शासनाच्या निर्णयाप्रमाणे सर्व घटकांवर करणे आवश्यक आहे."
**माधव जाधव**
**गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीवर्धन**

# खरोंडा गावठाण येथे सापडले पुरातन मंदिराचे अवशेष

**जव्हार, दि. १५ : प्रतिनिधी**

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या जव्हार तालुक्यातील खरोंडा गावठाण, ग्रामपंचायत पिंपळशेत–खरोंडा येथे अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेली प्राचीन पिंड व मंदिराचे भग्नावशेष पुन्हा प्रकाशात आले आहेत. सापडलेली पिंड अनेक पिढ्या उलटून गेल्या पूर्वीपासून अस्तित्वात असेल, असे स्थानिक जाणकार मंडळीचे म्हणणे आहे.मात्र या अवशेषाचे नेमके वय निश्चित सांगता येत नाही.

दरम्यान गावातील स्व. रामू हांडवा व स्व. देऊ हांडवा हे पूर्वी गावदेव मंदिरात पूजा-अर्चा करीत होते . त्यांच्या पश्चात त्यांची मुले विष्णू हांडवा व गुलाब हांडवा हे भक्तिभावाने पूजाविधी पार पाडत आहेत. या पुरातन पिंडीशी संबंधित एक आगळीवेगळी आख्यायिका प्रचलित आहे. कोणत्याही महत्त्वाच्या कामासाठी बाहेर पडताना पिंडीतील दगड हाताने उचलण्याची परंपरा आहे. काम यशस्वी होणार असल्यास दगड सहज उचलला जातो, अन्यथा तो उचलला जात नाही, अशी ग्रामस्थांची श्रद्धा आहे.

यंदा प्रथमच ग्रामपंचायत सरपंच दिनेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हुंबरन, माडवीहरा, सिंगारपाडा, हेदीचापाडा, पिंपळशेत व खरोंडा गावठाण येथील सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन महाशिवरात्रीचा उत्सव साजरा करणार आहेत.जुनी महादेवाची भग्न पिंड व नंदी मूर्ती ही मोठी ऐतिहासिक उपलब्धी मानली जात आहे.

" ही वास्तू फार जुनी आहे. उध्वस्त स्थितीत असली तरी ती मिळणे, सापडणे व शोध लागणे,ही मोठी उपलब्धी आहे. आपल्या पूर्वजांच्या पुरातन वारशाची ही महत्त्वाची पाऊलखूण आहे. अशा प्राचीन अधिष्ठान असलेल्या देवालयांचा जीर्णोद्धार राज्य पुरातत्त्व खात्याने करणे, आवश्यक आहे. शेवटी जे जुनं ते जपावं, टिकवावं हीच आपली संस्कृती आहे."

ग्रामस्थांनी या ऐतिहासिक ठेव्याचे संवर्धन व्हावे, यासाठी राज्य पुरातत्त्व विभागाने पुढाकार घ्यावा तसेच लोकसहभागातून जीर्णोद्धार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# पालघर-घोटी महामार्गाच्या विस्तारीकरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**दीपक मोहिते**
**पालघर, दि. १५**






| |
|---|
| एकूण खर्च - ३ हजार ३२० कोटी ३८ लाख रु. |
| महामार्गाची लांबी १५४. ६३५ कि.मी. |
| पालघर, डहाणू, जव्हार, मोखाडा, त्र्यंबकेश्वर, घोटी परिसरात विकासाला वेग |
| स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार |

केंद्रीय मंत्रिमंडळाने एनएच १६० महामार्गाच्या विस्तारीकरणाला नुकतीच मंजुरी दिली आहे. नाशिक जिल्ह्यातील घोटी व पालघर जिल्ह्यादरम्यान होणाऱ्या विस्तारीकरणाच्या या प्रकल्पाच्या ३ हजार ३२० कोटी ३८ लाख रु.आर्थिक निधीला केंद्र सरकारने नुकतीच मंजुरी दिली आहे.

सुमारे १५४.६३५ कि.मी. लांबीचा हा प्रकल्प नाशिक व पालघर जिल्ह्याला जोडणारा असून औद्योगिक विकास, लॉजीस्टिक, वाहतूक व कृषी क्षेत्राला वरदान ठरणारा आहे. हा प्रकल्प कार्यान्वित करण्याचा मुख्य उद्देश " पीएम गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन," अंतर्गत संपर्क वाढवणे, असा आहे. या दोन जिल्ह्यातून जाणारा हा महामार्ग, पश्चिम किनारपट्टी व दिल्ली - मुंबई एक्स्प्रेस वे जोडण्यात येणार आहे. या महामार्गाच्या विस्तारीकरणामुळे दोन जिल्ह्यातील आदिवासी भागाच्या विकासाला चालना मिळणार असून स्थानिक भूमीपुत्रांच्या मुलांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

काही वर्षांपूर्वी केंद्र सरकारने डहाणू - जव्हार - मोखाडा - त्र्यंबकेश्वर - नाशिक दरम्यान रेल्वेमार्ग निर्माण करण्याचा निर्णय घेतला होता. पण या प्रकल्पात अनेक अडचणी निर्माण झाल्यामुळे केंद्र सरकारने तो कालांतराने बासनात गुंडाळला. पण आता डहाणू - वाढवण येथे होणाऱ्या प्रस्तावित बंदराच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महामार्गाच्या विस्तारीकरण प्रकल्पाला नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हिरवा कंदील दाखवला आहे. त्यामुळे पालघर, जव्हार, डहाणू, मोखाडा, त्र्यंबकेश्वर,घोटी व नाशिक या भागात समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# ग्रामस्थांच्या लोक सहभागातून पाणीपुरवठा योजनांचे आज सशक्त संचालन

**विशेष प्रतिनिधी**
**पालघर, दि. १५**

जलजीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनांचे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करत ग्रामस्थांचा लोकसहभाग अधिक दृढ करण्यासाठी जिल्ह्यात " जल अर्पण दिन," साजरा करण्यात येत आहे. उद्या नागझरी ( ता. विक्रमगड ) व पेठ ग्रा.पं. तवा ( ता. डहाणू ) या दोन ग्रामपंचायतींमध्ये जलअर्पण दिन करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबाला कायमस्वरूपी, शुद्ध व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने जलजीवन मिशन अंतर्गत विविध पाणीपुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. ज्या गावांमध्ये योजना पूर्ण झाल्या आहेत, त्या योजना संबंधित ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात येत आहेत. नागझरी व पेठ तवा या गावांतील पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्याने उद्या अधिकृत हस्तांतरण प्रक्रियेसह " जलअर्पण दिन," साजरा करण्यात येणार आहे.




या कार्यक्रमांतर्गत ग्रामस्थांना पाणीपुरवठा योजनेची संपूर्ण माहिती देण्यात येईल. योजनेचे नियमित संचालन, देखभाल व दुरुस्ती यासाठी ग्रामस्थांकडून सामूहिक जबाबदारीची हमी घेण्यात येणार आहे. पाण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांची गावातून जनजागृती रॅली, जल प्रतिज्ञा व शुद्ध पाण्याच्या घोषणांसह मिरवणूक आयोजित करण्यात येणार आहे.

तसेच शुद्ध पाण्याच्या तपासणीसाठी वापरल्या जाणाऱ्या एफ.टी.के. किटचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात येणार आहे. कार्यक्रमात महिला बचत गट, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, शिक्षक व युवकांचा सक्रिय सहभाग राहणार आहे.

जिल्ह्यातील सर्व गावांनी जलजीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करत " जल अर्पण दिन," साजरा करून लोकसहभाग अधिक बळकट करावा, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता ) अतुल पारसकर व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सचिन सुरूम यांनी केले आहे.

# बोईसर-तारापूर रस्ता खचल्याप्रकरणी तातडीने दुरुस्तीचे आदेश

**बोईसर, दि. १५ : प्रतिनिधी**

बोईसर-तारापूर मुख्य रस्त्यावर रस्ता खचल्याने निर्माण झालेल्या धोकादायक स्थितीची सार्वजनिक बांधकाम विभागाने गंभीर दखल घेतली आहे. या संदर्भात विभागाचे अधिकारी आणि कंत्राटदार यांनी तातडीने घटनास्थळाची पाहणी करून रस्ता दुरुस्तीचे आश्वासन दिले आहे. तसेच, रस्त्यालगत विनापरवानगी खोदकाम करून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेतही प्रशासनाने दिले आहेत.



गेल्या काही दिवसांपासून या मुख्य रस्त्याला पडलेल्या भेगा आणि खचलेला भाग यामुळे अपघाताची शक्यता निर्माण झाली होती. या गंभीर विषयावर सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता अजय जाधव यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी तातडीने कंत्राटदाराला सूचना देऊन दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणावर कंत्राटदाराने आपली बाजू मांडताना खळबळजनक दावा केला आहे. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या इंडियन पेट्रोलियम पंपाकडून वारंवार रस्त्याच्या कडेला खोदकाम केले जाते,ज्यामुळे रस्त्याचा पाया कमकुवत होऊन तो खचत असल्याचे कंत्राटदाराचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर, "संबंधित ठेकेदाराला या प्रकरणाची सूचना देऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यास सांगितले आहे. रस्त्याची स्थिती सुधारण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जातील. मात्र, खोदकामामुळे रस्त्याचे नुकसान होत असून यापुढे विनापरवानगी काम झाल्यास विभागातर्फे कायदेशीर कारवाई केली जाईल," असे सहा. अभियंता अजय जाधव आणि कंत्राटदार भूषण भानुशाली यांनी स्पष्ट केले आहे. दुरुस्ती केवळ वरवरची मलमपट्टी ठरते की तांत्रिकदृष्ट्या भक्कम काम केले जाते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# बळीराजाला मोवाईलवर योग्य सल्ला मिळणार



> किसान कॉल सेंटर ही योजना शेतकऱ्यांसाठी विश्वासार्ह व मार्गदर्शक ठरत आहे. योग्य वेळी मिळणारा सल्ला शेतातील नुकसान टाळण्यास आणि उत्पन्न वाढवण्यास मोलाचा ठरत आहे.
>
> **- संजय घरत, कृषी अधिकारी**

**वाडा, दि. १५ : प्रतिनिधी**

शेतीमध्ये येणाऱ्या नवनवीन अडचणी आणि तांत्रिक बदलांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी केंद्र सरकारने किसान कॉल सेंटर उपक्रम हाती घेतला आहे. तंत्रज्ञान आणि तज्ज्ञांचा सल्ला आता थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचत असून, यामुळे उत्पादनात वाढ होण्यास मदत होत आहे.

शेतीमध्ये सातत्याने बदलत जाणारे तंत्रज्ञान, हवामानातील अनिश्चितता, कीड रोगांचा प्रादुर्भाव आणि बाजार भावातील चढ-उतार यामुळे शेतकऱ्यांसमोर नवनवीन प्रश्न उभे राहत आहेत. प्रश्नांना विहिरीत आणि अचूक उत्तर मिळणे आवश्यक झाले आहे. या गरजेतून केंद्र शासनाच्या वतीने किसान कॉल सेंटर ही महत्वकांक्षी योजना आता राबवण्यात येत आहे.

या सेवेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक भाषेत तज्ञांकडून तत्काळ सल्ला मिळत मिळतो, निर्णय क्षमता वाढून उत्पादनात सुधारणा होत आहे. परिणामी, बळीराजाला योग्य मार्गदर्शन मिळून शेती अधिक शाश्वत व नफ्याची ठरत आहे.

शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी ही सेवा आठवड्याचे सातही दिवस उपलब्ध असते. सकाळी सात ते रात्री नऊ या वेळेत शेतकरी कधीही कॉल करून तज्ञांशी संवाद साधू शकतात. असे प्रशासनानतर्फे सांगण्यात आले.

शेतकऱ्यांचे मनोबल वाढवून त्यांना आधुनिक पद्धतीच्या शेतीकडे वळवणे आणि त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे, स्थानिक भाषेत तत्काळ योग्य माहिती व सल्ला शेतकऱ्यांच्या समस्या वर त्वरित उपाय सांगणे, उत्पादन वाढवणे व शेती अधिक शाश्वत बनवणे हा मुख्य उद्देश आहे.

शेतकऱ्यांच्या त्यांच्या स्थानिक भाषेत माहिती दिली जाते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी मराठी भाषेत संवाद साधणारे कृषी पदवीधर उपलब्ध असतात. मराठीसह विविध भाषांमध्ये सल्ला उपलब्ध होत असल्यामुळे संवाद अधिक सोपा व परिणामकारक ठरतो.

शेतकरी कोणत्याही लँडलाईन किंवा मोबाईल वरून१८००-१८०-१५५१ या टोल फ्री क्रमांकावर विनामूल्य संपर्क साधू शकतात. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळू शकेल.

पीक लागवड, कीड रोग व्यवस्थापन, खत व औषधांचा वापर, हवामान, मृदा आरोग्य, पशुसंवर्धन व कृषी योजनांची माहिती कॉल सेंटरच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. किसान कॉल सेंटर योजनेमुळे तज्ज्ञांचा योग्य सल्ला शेतकऱ्यांना मिळाल्याने त्याचा त्यांना फायदा होईल.

किसान कॉल सेंटर ही भारत सरकारच्या कृषी आणि सहकार विभागामार्फत देणारी एक नाविन्यपूर्ण योजना आहे.२१ जाने. २०२४ रोजी सुरू झालेली ही सेवा देशातील कानाकोपऱ्यातील शेतकऱ्यांना कृषी तज्ञांशी थेट जोडण्याचे काम करते. कृषी विभाग, कृषी विद्यापीठ व विषय तज्ञ यांची मदत या सेवेत घेतली जाते.

# पालघर 'सरस' विक्री, प्रदर्शन व ग्लोबल कोकण महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जय्यत तयारी

**विशेष प्रतिनिधी**
**पालघर, दि. १५**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पालघर यांच्यातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या पालघर 'सरस,' विक्री व प्रदर्शन तसेच ग्लोबल कोकण महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हा परिषद पालघर येथे सरपंच परिषद उत्साहात पार पडली.

येत्या १८ ते २२ फेब्रु. २०२६ या कालावधीत शिरगाव बीच, पालघर येथे हा उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

पालघर 'सरस,' विक्री व प्रदर्शनामध्ये पालघर जिल्ह्यातील सुमारे १०० स्वयंसहाय्यता महिला बचत गट सहभागी होणार आहेत. बचत गटांनी तयार केलेल्या विविध हस्तकला वस्तू, गृहउपयोगी साहित्य, पारंपरिक उत्पादने तसेच आकर्षक व चविष्ट खाद्यपदार्थांची विक्री या प्रदर्शनात होणार आहे. ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे व त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

सरपंच परिषदेत शिरगाव, सातनपाटी, केळवे, माहीम, सफाळे, एडवण, बोईसर, उमरोळी, मनोर, नांदगाव व तारापूर या ग्रामपंचायतींना महोत्सवाच्या यशासाठी कामाला लागण्याचे यावेळी आवाहन करण्यात आले. प्रसिद्धी, स्वच्छता, पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्था व इतर आवश्यक सुविधांबाबत समन्वयाने कार्य करण्याचे निर्देश उपस्थित सरपंच अधिकाऱ्यांना देण्यात आले. कार्यक्रमाची सविस्तर माहिती देण्यात आली. पालघर 'सरस' विक्री व प्रदर्शन व ग्लोबल कोकण महोत्सवाची व्यापक प्रसिद्धी करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत माहिती पोहोचवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामीण महिलांच्या कर्तृत्वाला योग्य व्यासपीठ मिळण्यासाठी माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

ग्लोबल कोकण महोत्सवाचे आयोजक संजय यादवराव म्हणाले, "हा महोत्सव कोकणातील कला, संस्कृती, उत्पादने आणि महिला बचत गटांच्या कर्तृत्वाला व्यापक व्यासपीठ देणारा आहे. सर्व ग्रामपंचायतींनी व नागरिकांनी सक्रिय सहभागी होऊन हा उपक्रम यशस्वी करावा."

सरपंच परिषद व पत्रकार परिषदेच्या माध्यमातून पालघर 'सरस,' विक्री व प्रदर्शन आणि ग्लोबल कोकण महोत्सवाच्या आयोजनाला अधिक बळ मिळाले असून प्रशासन, ग्रामपंचायती, लोकप्रतिनिधी व माध्यमांच्या संयुक्त प्रयत्नांतून हा उपक्रम यशस्वी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कोकण सरस

उमेद
क्षितिज नवे विश्वास नवा

# डंपरांचा दिवसरात्र धुमाकूळ सुरूच



> आमच्या आगरवाडीतून गावातून मोठ्या प्रमाणात मातीवाहु अवजड हायवा जात असतात. दिवस-रात्र या गाड्या जात असल्याने वाहतूक कोंडीचाही सामना करावा लागतो. त्यातच बारावी परीक्षेच्या आगरवाडी केंद्र असल्याने विद्यार्थी मोठ्या प्रमाणात येजा करत असतात,त्यांची ही मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असते.
>
> **- जय पाटील, आगरवाडी सरपंच**

**सफाळे, दि. १५ : प्रतिनिधी**

पालघर तालुक्यातील सफाळे पश्चिमेस आगरवाडी परिसरात माती वाहतूक करणाऱ्या अवजड डंपरांच्या वाढत्या वाहतुकीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेष करून शनिवार व रविवारी दिवसभर तसेच रात्रीच्या सुमारास सुरू असलेल्या या डंपर वाहतुकीमुळे गावात वारंवार वाहतूक कोंडी होत आहे.त्यामुळे सामान्य नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, रात्री उशिरापर्यंत माती वाहतूक करणारे डंपर गावातून वेगाने व बेकायदेशीररीत्या जात असतात. काही ट्रक विनारॉयल्टी किंवा आवश्यक कागदपत्रांशिवाय धावत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. महसूल विभाग व वाहतूक पोलीस याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे का, असा सवाल नागरिक उपस्थित विचारत आहेत.

सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने गावातून व बाहेरून ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली आहे. अशा परिस्थितीत अवजड वाहनांच्या सततच्या ये-जामुळे अरुंद रस्त्यावर प्रचंड वाहतूककोंडी होत असते. रात्रीच्या वेळीही अशीच परिस्थिती असते.आपत्कालीन सेवा, रुग्णवाहिका तसेच इतर वाहनचालकांनाही अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

गावकऱ्यांनी संबंधित प्रशासन व महसूल विभागाने तात्काळ दखल घेऊन मातीची अवैध वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच रात्रीच्या वेळेत अवजड वाहनांवर निर्बंध घालावेत आणि नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशीही मागणी होत आहे.

दरम्यान, या प्रकारामुळे गावातील रस्त्यांचीही मोठ्या प्रमाणात झीज होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. प्रशासनाने त्वरित कारवाई करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार**
**जि. पालघर.-४०१ ६०३**
**Web. http://mahatenders.gov.in**
**Email. jawhar.ee@mahapwd.com**
**ई-निविदा सुचना क्रमांक-२५ सन-२०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार जिल्हा पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून ई-निविदेमधील सर्व अटी शर्तीची पुर्तता करणाऱ्या **योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन** खालील कामांकरीता **'बी-१'** नमुन्यातील ई-निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर **https://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच ई-निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली ई-निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची मुळ किंमत रु. लक्ष | इसारा रकम रुपये | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जव्हार तालुक्यातील खर्डी, परळी, उज्जैनी, जव्हार, सारसुन ते सरहद्दीपर्यंतचा रस्ता रामा. ७७ वरील सा.क्रं.८४/३०० येथील पुलाची पुर्नबांधणी करणे. ता. जव्हार, जि. पालघर. | ५,१२,८९,७१९.०० | २,६६,०००.०० | अनिवार्य नाही | + १८% रु. ३०००/- जिएसटी रु. ५४०/- एकुण रु. ३५४०/- | १२ महिने (पावसाळा धरुन) | ५०५४ मार्ग व पूल ०३ राज्यमार्ग ५०५४०३४९-५३ |
| २ | पर्यटनस्थळ दाभोसा वाटर फॉल येथे स्काय वाक पुल आणि उद्यानाचे बांधकाम करणे. ता. जव्हार, जि. पालघर | १,६३,९५,९२३.०० | १,५०,०००.०० | अनिवार्य नाही | रु. २०००/- + १८% जिएसटी रु. ३६०/- एकुण रु. २३६०/- | ०६ महिने (पावसाळा धरुन) | ३४५२ पर्यटन स्थळ विकास ३४५२२९३६-३१ |
| ३ | कुडूस कंचाड रस्ता प्रजिमा-४३ कि.मी. २/१०० ते २/५००, २/७०० ते ३/२००, ९/१०० ते १०/०००, १२/००० ते १२/८०० मध्ये रस्त्याची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. ता. वाडा, जि. पालघर | ४९,०६,७०९.०० | ५१,०००.०० | वर्ग ४-अ व त्यावरील | रु. १०००/- + १८% जिएसटी रु. १८०/- एकुण रु. ११८०/- | १२ महिने (पावसाळा धरुन) | ३०५४ मार्ग व पूल ३०५४०१११-२७ |
| ४ | दसकोड धबधबा पर्यटनस्थळ जाणाऱ्या रस्त्याची सुधारणा करणे. ता. जव्हार, जि. पालघर | ३१,९०,६७८.०० | ३४,०००.०० | वर्ग ५ व त्यावरील | रु. ५००/- + १८% जिएसटी रु. ९०/- एकुण रु. ५९०/- | १८० दिवस (पावसाळा धरुन) | ३४५२ पर्यटन स्थळ विकास ३४५२२९३६-३१ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** — **दिनांक-१६/०२/२०२६ ते दिनांक २३/०२/२०२६ पर्यंत**
**ई-निविदा उघडणे** — **दिनांक-२४/०२/२०२६ (११.०० वा. शक्य झाल्यास)**
**निविदा पुर्व बैठक (काम अ.क्र.०१)** — **दिनांक-१७/०२/२०२६ मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, कोंकण मुंबई यांचे कार्यालयात दुपारी १२.०० वाजता**
**निविदा पूर्व बैठक (कीम अ.क्र. ०२)** — **दिनांक-१७/०२/२०२६ मा. अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, ठाणे यांचे कार्यालयात दुपारी १२.०० वाजता**

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**टिप :-** १ सर्व पात्र / इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या संकेतस्थळावर **https://mahatenders.gov.in**

२ निविदाकारांनी वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व **DSC** डिजिटल प्रमाणपत्र वितरीत व Portal वर **Enrollment** करण्यासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. Toll Free No. : १८००३०७०२२३२, E-Mail: eproc.maharashtra@gmail.com,cppp-support@nic.in

३ निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा/ बयाणा रक्कम ई-निविदा संचाची किंमत याबाबतचे दस्तऐवजाच्या मुळ प्रती स्वतःच्या नावाची गोपनीयता बाळगुन ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

४ शासन निर्णयानुसार निम्नतम निविदाकाराचा **(L-१)** कमी दराबाबतचा **(Performance Security)** चा **FDR/B.G.** लिफाफा क्र. २ **(Financial Bid)** उघडल्याच्या दिनांकापासून ८ **(आठ)** दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करण्यात यावा. सादर न केल्यास निम्नतम निविदाकाराची **(L-१)** इसारा रक्कम **(EMD)** शासन जमा करण्यात येईल व वतीय निम्नतम निविदाकारास **(L-२)** ला काम देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५ इतर अटी व शर्ती ई-निविदे मध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

६ वरील कामांची ई-निविदा सुचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**जा.क्र./सा.बां.वि./जव्हार/निविदा/४९७/२०२६**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार**
**जिल्हा-पालघर, पिनकोड-४०१६०३**
**दिनांक-१०/०२/२०२६**

**डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C५८३६**

**सही/-**
**कार्यकारी अभियता**
**सा. बां. विभाग, जव्हार जि. पालघर.**

# श्री क्षेत्र घुटकेश्वर महादेव मंदिरांत भक्तांची अलोट गर्दी

**मोखाडा, दि. १५ : प्रतिनिधी**



वाकडपाडा येथे महाशिवरात्र निमित्ताने श्री घुटकेश्वर महादेव मंदिरांत पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी दर्शन घेतले.येथील मंदिर समितीच्या वतीने महाशिवरात्रीच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.पायी दिंड्यांनी टाळ मृदंगाच्या गजरात शिवशंभोचा नामघोष करत मंदिरात प्रवेश केल्यामुळे मंदिर परिसर अक्षरशः शिवमय झाला होता.

यावेळी मंदिर समिती अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी शिवपुजेला आलेल्या शिवभक्तांचे स्वागत करुन देणगीदारांना शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. सकाळपासून विविध गांवामधुन पायी दिंड्या भजन किर्तनाचा जयघोष करीत श्री घुटकेश्वराच्या दर्शनासाठी येत होत्या.महादेवाच्या पिंडीवर अभिषेक, महाआरती, स्वाध्याय परिवाराचा सुश्राव्य कार्यक्रम,शिव किर्तन व रात्री भजन असा संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. मोखाडा तालुक्यातील वाकडपाडा येथील घुटकेश्वर महादेव मंदिराला पुरातन इतिहास असून त्यामूळे या अतिप्राचीन शिवमंदिरात श्री घुटकेश्वर महादेवाचे दर्शन घेण्यासाठी परीसरातील शेकडो भाविकांनी आज सकाळपासून प्रचंड गर्दी क केल्याचे पहावयास मिळाले.

तिर्थक्षेत्राला प्राचीन संस्कृती असल्याने महाराष्ट्र शासनाच्या तिर्थक्षेत्र विकास योजनेतून या ठिकाणी अनेक विकासकामे करण्यात आली आहेत.या ठिकाणी परीसरातील अनेक व्यवसायिकांनी फराळ,खेळणी,गृहउपयोगी वस्तूचे स्टॉल लावले होते.त्यामुळे यात्रेच्या निमित्ताने आलेल्या भाविकांना खरेदीचा आनंद देखील घेता आला.

या कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या भाविकांचे आभार मंदिर समितीचे अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी मानले आहेत.

# मुरबाड तालुक्यामध्ये स्मार्ट मीटर बसवण्याचा सपाटा

## कोणतीही पूर्वसूचना न देता, घरात कोणी नसताना मीटर काढण्याचे प्रकार

**मुरबाड, दि. १५ : प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्यामध्ये मागील १५ दिवसांपासून कल्याण महावितरण अधिकाऱ्यांकडून अदानीचे स्मार्ट मीटर बसवण्याची ग्राहकांना सक्ती सुरू आहे.मात्र भरमसाठ वीजचोरी करणारे फार्महाऊस,पोल्ट्रीफार्म,वीटभट्टी,हॉटेल,धाबे यांच्यावर पडदा टाकला जातो. मोठ्या वापरांवर वीज चोरी होते त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी प्रामाणिकपणे वीजबिल भरणाऱ्या गरिबांच्या घरांचे मीटर काढून स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती का? असा सवाल मुरबाड तालुक्यातील नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

मुरबाड तालुक्यामध्ये विद्युत मंडळाचा मनमानी कारभार सुरू असून मुख्यमंत्री व न्यायालयाचे आदेश झुगारुन ग्राहकांची संमती न घेता जबरदस्तीने मीटर काढून घेतले जात आहेत. सध्या दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू असून काहींच्या घरी वीज पुरवठा खंडित केल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम झाला असल्याचे सांगण्यात आले. एक महिन्याचे विजबिल भरण्याची तारीख पुढे गेली तरी काही ग्राहकांचे वीज मीटर काढून नेले असून गेल्या १५ दिवसापासून ग्राहक अंधारात चाचपडत आहेत. खेडोपाड्यात सध्या मीटर काढून नेण्याची मोहीम कल्याण विभागाकडून सुरु आहे. घरात कोणी नसताना मीटर काढून नेले जात असल्याने ग्राहकांना हे काम कोण करतो याचा थांगपत्ताही लागू देत नाही. मीटर काढणारे आपले नाव देखील सांगत नाहीत. याचा तपास कुठे करावा ? तर हे सरळगाव व मुरबाड वीज कार्यालयाला माहित नसल्याने कोणाकडे दाद मागावी या विवंचनेत ग्राहक सापडले आहेत. कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित करण्याचे संतापजनक प्रकार मुरबाड वीज वितरण विभागाकडून सर्रास सुरु असल्याने ग्राहक त्रस्त झाले आहेत.

वीज वितरण कंपनीच्या हम करे सो कारभाराला कंटाळलेल्या शेतकऱ्यांनी आंदोलनाचा चेहरा ओळख असलेले माजी जि.प सदस्य सुभाष घरत यांच्याकडे दाद मागितली आहे. मागील वर्षभरापूर्वीच अशीच मनमानी वीज वितरण कंपनीने केली असता, त्यांनी जाहीर मोर्चा काढून

महामंडळाला जनतेची ताकद दाखवली होती. मीटर व्यवस्थित असताना तसेच ग्राहक वेळेवर बिल भरत असताना देखील अदानीचे मीटर बसवण्याचा अट्टाहास सुरु आहे. या मीटर विरोधात महिला वर्ग ही एकवटला आहे.

अनेक ग्राहकांना वीज मीटरमध्ये रीडिंग नसल्याचे कारण देत मीटर दुरुस्ती करुन देतो अशी बतावणी करूनत मीटर काढून नेण्यात येत आहेत. या अन्यायकारक कारभाराविरोधात दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, मोठ्या प्रमाणावर वीज वापर करणाऱ्या फार्म हाऊस, पोल्ट्रीफार्म, वीट भट्ट्या, हॉटेल व धाबे येथे होणारी वीज चोरी तात्काळ पकडावी, अशी मागणी ग्राहकांनी केली आहे. प्रामाणिकपणे वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांवर स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती करू नये, अशीही त्यांची भूमिका आहे. अन्यथा ग्राहकांकडून कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

# विक्रमगड येथे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ संपन्न

**विक्रमगड, दि. १५ : प्रतिनिधी**



तालुक्यातील औंदे येथील कला वाणिज्य महाविद्यालय यांचे आज वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळा खा. हेमंत सावरा यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

गेल्या पंधरा ते वीस वर्षापासून या तालुक्यात कला व वाणिज्य महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध झाल्याने आज असंख्य विद्यार्थी विद्यार्थिनी या महाविद्यालयातून शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या भागात शिक्षणापासून कोणी वंचित राहत नसल्याचे खा. हेमंत सवरा यांनी सांगितले. हजारो विद्यार्थी या संस्थेच्या माध्यमातून शिक्षण घेऊन बाहेर पडत असल्याने त्यानी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या महाविद्यालयातील उत्कृष्ट काम करणाऱ्या व काही प्राध्यापकांना पुरस्कार प्राप्त झाले आहेत. महाविद्यालयाच्या वतीने खा. हेमंत सवरा यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी विभागीय स्तर जिल्हा स्तरावर व महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यां विविध स्पर्धेमध्ये यशस्वी झाले,त्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

या स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे कृषी सभापती संदीप पावडे, पंचायत समितीचे माजी सभापती मधुकर खुताडे, महेश आळशी, कला वाणिज्य महाविद्यालयाचे कमिटी अध्यक्ष मिलिंद पाटील, डॉ सुधाकर पाटील व इतर संचालक मंडळ, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक ,प्राचार्य व विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# विक्रमगड तालुक्यात महाशिवरात्री उत्साहात साजरा

**विक्रमगड, दि. १५ : प्रतिनिधी**



महाशिवरात्री निमित्तने विक्रमगड तालुक्यातील कावळे व नागझरी येथे शिवमंदिरात सकाळपासूनच भाविकांची गर्दी झाली होती. तालुक्यातील नागझरी व कावळे येथे महाशिवरात्री निमित्ताने मोठ्या यात्रेचे आयोजन केले जाते. महाशिवरात्री निमित्ताने हजारो भाविक येथे शिवमंदिराचे दर्शन घेत असतात.नागझरी येथे उत्खननात काही शिवलिंग सापडल्याने हे शिवलिंग पांडवकालीन शिवमंदिर असल्याचे सांगण्यात येते. निसर्गरम्य ठिकाणी हे असलेल्या मंदिराला जिल्ह्याच्या विविध ठिकाणाहून तसेच कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनासाठी येत असतात. आज या नागझरी व कावळे शिव मंदिरात सकाळपासूनच शिवाभिषेक भजन कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.

# जिल्हा परिषद शाळा–नाणे येथे 'आनंद बाजार' उत्साहात संपन्न

**वाडा, दि. १५ : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळा नाणे येथे 'आनंददायी शनिवार,' उपक्रमांतर्गत 'आनंद बाजार' सकाळी ९.०० ते ११.३० या वेळेत उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमात शाळेतील लहान गटातील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाऊचे पदार्थ, घरगुती बनविलेले पदार्थ, विविध भाज्या, स्थानिक फळे तसेच पालेभाज्यांचे आकर्षक स्टॉल लावले होते. विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच गणित विषयाचे व्यवहारिक ज्ञान मिळावे, पैशांचे व्यवहार समजावेत आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला होता.

विद्यार्थ्यांनी खरेदी-विक्रीचे व्यवहार स्वतः हाताळत आनंदाने आपला सहभाग नोंदवला. पालकही आपल्या मुलांना प्रोत्साहन देत मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. याप्रसंगी उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या स्टॉलवरून विविध वस्तूंची खरेदी करून उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्टॉल लावलेल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान पाहण्यासारखा होता . 'आनंद बाजार' या उपक्रमासाठी सर्व विद्यार्थ्यांना सहकार्य केल्याबद्दल शाळेतर्फे उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.



**कुळगांव बदलापूर नगरपरिषद कार्यालयातील संत सेवालाल महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला आहे. मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरपरिषद कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

# सिएमआर मिलींग करणाऱ्या व त्यांच्या नातेवाईकांचे गोदाम किरायाने घेण्यात येऊ नये

# किशोर कऱ्हाडेची प्रधान सचिवांकडे मागणी

**देसाईगंज, दि. १५ : प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर मिलींग करणारे राईसमिलर्स सिएमआर मिलींग मध्ये प्रचंड गैरव्यवहार करून शासनाची कोट्यवधी रुपयाने फसवणूक करीत असल्याचे अनेक घटनांवरून स्पष्ट झाल्याने शासनाने गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर तांदुळ जमा करण्याकरीता सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्सच्या मालकीचे अथवा त्यांच्या नातेवाईकांच्या मालकीचे गोदाम किरायाने घेण्यात येऊ नये,अशी मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी नमूद केले आहे की गडचिरोली जिल्ह्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शासनाने शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला धान जिल्ह्यातील राईसमिलर्सना भरडाई करीता देण्यात येतो.भरडाई नंतर तयार झालेला तांदूळ शासकीय गोदामात जमा करण्यात येतो.परंतु शासकीय गोदामाची साठवणूक क्षमता अपुरी असल्यास खाजगी गोदाम किरायाने घेण्यात येतात.

देसाईगंज (वडसा)नैनपुर येथील आकाश अग्रवाल गोदाम व कुरुड येथील पंकज मोटवाणी गोदाम शासनाने पणन हंगाम २०२२-२३ ते २०२४-२५ मध्ये किरायाने घेतलेले आहेत. या दोन्ही गोदाम मध्ये सिएमआर तांदूळ जमा करतांना सिएमआर धान भरडाई करणाऱ्या राईसमिलर्सनी वरील दोन्ही गोदामावर नियुक्त गुणनियंत्रण अधिकारी व पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकारी यांचेसोबत संगनमत करून प्रचंड गैरव्यवहार व घोटाळे केले आहेत.

दरम्यान उपरोक्त गोदामातुन सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून पुरवठा करण्यात आलेला तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य आढळून आला आहे.त्यामुळे सिएमआर तांदूळ गोदाममध्ये जमा करतांना होणारे गैरव्यवहार टाळण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर तांदूळ जमा करण्याकरिता सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्सच्या मालकिचे व त्यांचे नातेवाईकांच्या मालकिचे गोदाम किरायाने घेण्यात येऊ नये,अशी मागणी कऱ्हाडे यांनी केली आहे.याबाबत प्रधान सचिव काय कारवाई करतात याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.


## सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | मुंबई बाजार पत्थर फोड एकच |
|---|---|
| ० १ ४ ७ | ३ ५ ६ ९ |
| १३६ ५६० १४९ १६० | १३९ ७८० २४० ३७९ |
| ३७० ३८० २५७ २५० | २३८ ४४७ ३३० २८९ |
| २८० ४७० ३४७ ३४० | ३४६ १४० ४६६ १८० |
| जोडी | जोडी |
| ०२ - १२ - ४३ - ७३ | ३२ - ५२ - ६१ - ९१ |
| ०५ - १५ - ४६ - ७६ | ३० - ५० - ६७ - ९७ |
| ०८ - १८ - ४९ - ७९ | ३८ - ५८ - ६४ - ९४ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १६ फेब्रुवारी २०२६

## सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६

| | |
|---|---|
| सर्व बाजार साठी | २१ - ५१ - ६० - ९० |
| | २४ - ५४ - ६८ - ९८ |
| | २७ - ५७ - ६३ - ९३ |
| | -------------------- |
| | २२८ - ५०० - ६०० - १९९ |
| | ३९० - १५९ - २४० - २८९ |
| | ४८० - २४० - ३३० - ३७९ |

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका. नाहीतर फसवणूक होईल. आज नोकरीत पदोन्नती होईल. किंवा तुम्हाला पदोन्नतीची चांगली बातमी मिळेल. प्रकृतीकडे लक्ष पुरवा.

**वृषभ :** विरोधक तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या. व्यवसायातील समस्यांबद्दल अधिक जागरूक राहावे, अन्यथा नुकसान होऊ शकते.

**मिथुन :** आज दिवसाची सुरुवात चांगल्या बातम्यांनी होईल. व्यवसायात वेळेवर काम करा. प्रगतीसोबतच नफाही मिळेल. पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. जनतेकडून प्रचंड सहकार्य आणि पाठिंबा मिळेल.

**कर्क :** आजचा दिवस मिश्रित परिणामांचा असेल. खूप मेहनत केल्यानंतर यश मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस वाढेल. कोणत्याही महत्त्वाच्या कामातील अडथळे सरकारी मदतीने दूर होतील.

**सिंह :** आज प्रेमसंबंध अधिक दृढ होतील. महत्त्वाचे पद मिळाल्याने समाजात तुमचा प्रभाव वाढेल. कठोर परिश्रमामुळे मालमत्तेशी संबंधित कामात यश मिळेल.

**कन्या :** व्यवसायात लक्षणीय यश मिळेल. जोडीदाराकडून तुम्हाला पाठिंबा आणि साथ मिळेल. सुरक्षा क्षेत्रात नोकरी शोधणाजया लोकांना विशेष यश मिळेल.

**तुळ :** आजचा दिवस नफा आणि प्रगतीचा असेल. महत्त्वाच्या कामात यशाचे संकेत मिळतील. तुम्ही नवीन काम सुरू करू शकता. नातेवाईक आणि जवळच्या मित्रांकडून सहकार्य मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** आज तुमचे अशांत असेल आणि कशाचाही उत्साह वाटणार नाही. तुम्हाला काम करण्याची इच्छा होणार नाही. तुम्ही आळसाला बळी पडू शकता. कामाच्या ठिकाणी आळस आणि निष्काळजीपणा टाळा.


**धनु :** आज तुम्हाला तुमच्या मुलांकडून मस्त, चांगली बातमी मिळेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला नवीन मित्र मिळतील. बौद्धिक काम करणाजया लोकांना मोठे यश आणि आदर मिळेल.

**मकर :** कामाच्या ठिकाणी सकारात्मक बदल दिसून येतील. काही काळापूर्वी अडकलेले इच्छित काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. व्यवसायात नवीन करार होऊ शकतात. उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**कुंभ :** आज तुम्हाला चांगली बातमी मिळू शकते. तुमच्या नोकरीत बढती तर मिळेलच पण तुमच्या इच्छित ठिकाणी पोस्टिंगही होईल. कामाच्या संदर्भात नवीन कामाच्या योजना आखल्या जातील.

**मीन :** नोकरीत बदलीची शक्यता आहे. भविष्यात चांगले फायदे मिळण्याची शक्यता आहे. स्वत:वर विश्वास ठेवा. इतरांच्या बोलण्यात अडकू नका. अन्यथा फसगत होऊ शकते.

## शब्दकोडे क्रमांक २३५५



**उभे शब्द :-**
१) पोते
२) गणितातील उणे
३) जास्तीत जास्त
४) मध
५) जातीचा गुण, सत्वांश
६) रविवासर
७) हिंदुस्थान
८) रक्षण करणारा
१०) नवऱ्याची दुसरी पत्नी
१२) मालक
१४) गरजू मनुष्य
१६) चांगला
१८) मुख, चेहरा
१९) पार्वतीचे एक नाव
२०) पैशाचा ढीग
२१) लांबट चौकोन
२२) अळशी धान्याचे एक नाव
२३) मर्कट
२४) धमनी
२५) वाकबगार, निष्णांत
२६) अंकुर
२८) संत्र, मोसंबीच्या जातीतील एक मोठे फळ
३०) वजनदार
३१) पराक्रमाबद्दल मिळणारा बिल्ला
३३) विद्यार्थ्यांची राहण्याची सोय असलेली इमारत
३५) योग्य, उचित, बरोबर
३६) पैंजण
३८) निस्तेज, उदास, खिन्न
३९) तळण्याचे पात्र
४०) कपाळभर लावलेले कुंकू
४१) भात शिजतानाचा आवाज
४५) श्रीमंत
४६) उगाच, विनाकारण
४७) नियमित यात्रा करणारा
४९) घसा साफ करणे, बेडका
५०) गणेशाला आवडणारा गोड पदार्थ
५१) बाज विणण्याची सुती पट्टी
५३) देवळाच्या शिखराचे टोक

(उत्तर उद्याच्या अंकात)

**आडवे शब्द :-**
१) झेंडा, ध्वज
४) भुंगा, भ्रमर
७) झुणका ***
९) काढलेली सुट्टी
१०) संयुक्त मालकीचा
११) बारीकसारीक तपशीलासह
१२) शुभ्र, पांढरा
१३) वर्ण
१५) नक्षीदार ताटली
१७) लोणी
१९) जेवणे
२०) मुंबईचा घरगडी
२१) रव, ध्वनी
२२) लोकांच्या मनातील विचार
२५) मित्र
२७) सत्वांश
२८) तसराळे
२९) चित्रपटाचा पडदा
३२) फुरसत
३४) एक फळ
३७) नम्रतेने मान खाली घातलेला
४०) दहावी रास
४२) पुष्कळ
४३) ढगांनी भरलेले पावसाळी वातावरण
४४) वल्लरी
४६) मिठाई तयार करणारा
४८) लाकडाचे गोदाम, माल साठविण्याची जागा
५०) श्रीकृष्णाचे एक नाव
५२)लेख लिहिणारा
५३) त्रासदायक बडबड
५४) चणचण, दुर्भिक्ष
५५) गोदावरीच्या काठावरचे तीर्थक्षेत्र
५६) खबदडी
५७) धोबी
५८) यथाशास्त्र, पद्धतीनुसार
५९) बैलाच्या मानेवरील जोखड

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# स्नेहा दुबे पंडीत यांची इंग्लंड दौऱ्यासाठी निवड

**दीपक मोहिते**
**पालघर, दि. १५**



महाराष्ट्राच्या विधानसभेच्या २८८ आमदारापैकी १५ ते १६ आमदारांची यु. डब्ल्यू. टी. एस. डी. च्या दौऱ्यासाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये भाजपाकडून निवड केलेल्या आमदारांमध्ये प्रथमच वसईच्या आ. स्नेहा दुबे पंडीत यांची निवड झाली आहे. त्यांची ही निवड वसईकरांसाठी नक्कीच अभिमानास्पद बाब असल्याचे मानण्यात येत आहे.

"युनिव्हर्सिटी ऑफ वेल्स ट्रिनिटी सेंट डेव्हिड" हे यु. के. तील एक नामांकित विद्यापीठ आहे. प्रामुख्याने विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषद सभापतींच्या मार्गदर्शनाखाली यासाठी आमदारांची निवड होते. यामध्ये प्रामुख्याने युवा आणि अभ्यासू आमदारांना प्राधान्य देण्यात येत असते. यावेळी वसईच्या आ. स्नेहा दुबे पंडीत यांचा समावेश करण्यात आला आहे. या दौऱ्यात आमदार वेल्सच्या संसदेला भेट देतात आणि त्यांची संसदीय कार्यपद्धती, लोकशाही प्रक्रिया आणि विकेंद्रीकरण समजून घेतात.सोप्या भाषेत सांगायचे तर, राज्याच्या विकासासाठी जागतिक स्तरावरील उत्तम प्रशासन पद्धती आणि धोरणे अभ्यासणे, हा या भेटीचा मुख्य उद्देश असतो. यापूर्वी २०23 मध्ये आताचे मुंबई अध्यक्ष अमित साटम हे सहभागी झाले होते. त्यांनी तशा स्वरूपाचे विधेयक मांडले होते. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधान परिषदेच्या उपसभापती म्हणून अनेकदा अशा शिष्टमंडळांचे नेतृत्व केले आहे. या दौऱ्याचा पालघर जिल्ह्याच्या भविष्यातील नियोजनासाठी नक्कीच फायदा होईल, असे भाजपच्या आमदारांचे म्हणणे आहे. आ. स्नेहा दुबे पंडित यांच्या समावेशामुळे राज्यातील पर्यावरण, हवामान बदल, शाश्वत विकास आणि कृषी उत्पादनांना प्रोत्साहन मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# तिळसे येथे फुलला भक्तांचा मळा

**वाडा, दि. १५ : प्रतिनिधी**



महाशिवरात्री निमित्ताने आज तालुक्यातील तिळसे येथे हजारो शिवभक्तांनी तिळसेश्वर महादेवाचे दर्शन घेतले. त्याचप्रमाणे कोंढले , नारे, घोडमाळ, गातेस, सापने येथील मंदिरात भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. या यात्रेचे आकर्षण म्हणजे तिळसेश्वर मंदिराच्या बाजूला असलेल्या वैतरणा नदीच्या डोहातील देव मासे. ते बघण्यासाठी भाविकांनी एकच गर्दी केली होती.

पहाटेपासून हजारो शिवभक्तांनी महादेवाचे दर्शन घेतले. तिळसा परिसर भक्तांनी फुलून गेला होता. यावेळी हर हर महादेवाच्या घोषणा देण्यात आल्या. यात्रेत भाविकांना विविध पक्ष व संघटनांच्यावतीने पाणी, सरबत व फराळाची मोफत सोय केली होती. दूरवरून येणाऱ्या भाविकांसाठी वाडा आगारातून पाच ते दहा मिनिटांनी बसेसची व्यवस्था करण्यात आली होती.तसेच ग्रामस्थांकडून पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती.

तिळसा देवस्थानच्या वतीने भक्तांसाठी चांगले नियोजन करण्यात आले होते. भक्तांना वेळोवेळी स्पीकर वरून मार्गदर्शन करण्यात येत होते. स्वच्छ व सुंदर तिळसे ठेवण्यासाठी वेळोवेळी माहिती दिली जात होती. कचरा इतरत्र न टाकता कचऱ्याच्या पेटीत टाकण्याच्या सूचना दिल्या जात होत्या.

तिळसा येथे वाडा पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे अनुसूचित प्रकार न घडल्याची माहिती वाड्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे यांनी दिली. भक्तांनीही स्वयंशिस्त पाळली.

# वाड्यात भाजपच्या वतीने निषेध आंदोलन

**वाडा, दि. १५ : प्रतिनिधी**



छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून त्यांना समकक्ष ठरवण्याचा जो दुर्दैवी व आक्षेपार्ह प्रकार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी केला,तो केवळ ऐतिहासिक अज्ञानच नव्हे तर महाराष्ट्राच्या अस्मितेवर थेट घाला आहे.याचा निषेध म्हणून भाजपच्या वतीने आज भाजप पक्ष कार्यालय ते वाडा बसस्थानक दरम्यान निषेध मोर्चा काढून आंदोलन करण्यात आले. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी काँग्रेस विरुद्ध जोरदार घोषणाबाजी करत आपला तीव्र संताप व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना जबरदस्तीने धर्मांध राजवटीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या टीपू सुलतानशी करणं म्हणजे इतिहासाचा अपमान आहे.

काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी केलेल्या या विधानाबद्दल संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. अशा व्यक्तीला महाराष्ट्रात राहण्याचा नैतिक अधिकार नाही. त्यांच्या विधानाबद्दल केवळ माफी नव्हे, तर काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर तात्काळ कारवाई करून बडतर्फ करावं अशी मागणी यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी केली.

या आंदोलनामध्ये भाजपचे जेष्ठ नेते बाबाजी काठोळे, जिल्हा उपाध्यक्ष संदीप पवार, उपनगराध्यक्ष मनीष देहेरकर, व अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# डहाणू - ब्राम्हणपाडा येथे तलावामध्ये माति भराव



**डहाणू, दि. १५ : प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील दाभले (ब्राह्मणपाडा) परिसरातील व्यवसायिक मत्स्यपालनाचे तलावात मोठ्या प्रमाणात मातीभराव करून बुजवण्यात येत असल्याचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. या कामासाठी अधिकृत परवानगी घेण्यात आली आहे का आणि शासनाची रॉयल्टी भरली आहे की नाही, याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये संशय व्यक्त करण्यात येत आहे.

सदर तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर काळी माती टाकून भराव करण्यात येत असून, हा प्रकार नेमका कोणाच्या आदेशाने सुरू आहे, याबाबत स्पष्टता नसल्याचे दिसून येते. यासंदर्भात संबंधित तलाठी प्रताप सांबर यांच्याशी संपर्क साधला असता, भराव सुरू असताना प्रत्यक्ष स्थळपाहणी केली नसल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, भराव सुरू होण्यापूर्वी पाहणी केली होती, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे भरावाच्या प्रत्यक्ष कामकाजा दरम्यान पाहणी का करण्यात आली नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> सदर ठिकाणचा पंचनामा करून सविस्तर अहवाल तहसील कार्यालयात सादर करण्यासाठी कार्यालयीन अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
>
> **-निलेश साळुंखे, मंडळ अधिकारी, वाणगाव**

दरम्यान, १३ फेब्रु. रोजी सकाळी सुमारे ९ वाजता डहाणूचे तहसीलदार सुनील कोळी यांनी संबंधित ठिकाणी भेट देऊन पाहणी केल्याची माहिती मिळाली आहे. तथापि, तहसीलदारांच्या भेटीनंतरही मातीभरावाचे काम सुरूच असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे महसूल विभागाच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबतही संशय व्यक्त करण्यात येत आहे.

सदर माती ही बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी सुरू असलेल्या कामातून काढण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. हा प्रकल्प बुलेट ट्रेनच्या अखत्यारीत असून प्रत्यक्ष कामामध्ये लार्सन अँड टूब्रो या कंपनीचा सहभाग असल्याचे समजते. या मातीसाठी आवश्यक महसुली परवानग्या व रॉयल्टी भरण्यात आली आहे का, याबाबत अद्याप कोणताही अधिकृत अहवाल उपलब्ध नसल्याचे समजते.

तलाठींकडून मिळालेल्या माहितीनुसार, रॉयल्टी संदर्भातील खात्रीशीर कागदपत्रे सध्या उपलब्ध नसल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे. तहसीलदारांच्या प्रत्यक्ष पाहणीनंतर जर शासनाचा महसूल बुडवून मातीभराव केल्याचे निष्पन्न झाले, तर संबंधित प्रकल्प यंत्रणा, ठेकेदार तसेच माती वाहतूक करणाऱ्यांवर नेमकी कोणती कारवाई होणार, याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# मोखाडा येथे "सायकल टू स्कूल" उपक्रम संपन्न

**मोखाडा, दि. १५ : प्रतिनिधी**



मोखाडा साई मंदिर येथे " सायकुल टु स्कूल," उपक्रम मोखाडा पोलिस ठाणे व युथ फॉर पीपल चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.या उपक्रमास पालघर जिल्हा पोलिस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या सह आ. हरिश्चंद्र भोये, माजी आ. सुनील भुसारा,प्रकाश निकम आदीसह लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

सायकल वाटप, हे एक कारण झालं.मात्र पोलिस प्रशासन म्हणून आमचा सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना संदेश की तुमच्या स्वप्नांना रंग देण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. कोणत्याही अडचणी आम्हाला कळवा आम्ही त्या तुमच्या आणि सर्व सामान्यांच्या सहभागातून सोडवू तसेच पालघर जिल्हाधिकारी मॅडमचा आदर्श ठेवून मुलींनी शिक्षण घ्यावे,असे आवाहन पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांनी केले.

यावेळी विक्रमगड विधानसभेचे आ. हरिश्चंद्र भोये यांनी या उपक्रमाबद्दल मोखाडा पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक प्रेमनाथ ढोले यांचे अभिनंदन केले. या वेळी भोये यावेळी म्हणाले, पूर्वी या भागात शिक्षा म्हणून अधिकारी यायचे,मात्र आता या भागातील सर्वच विभागात काम करणारे अधिकारी सामाजिक भावनेतून काम करत असतात. मोखाडा हा दुर्गम तालुका असून या भागात अशा उपक्रमांची गरज आहे,असे सांगतानाच या सायकलीमुळे मुलींना शिक्षण घेता येईल. असे उदगार आ. भोये यांनी काढले. माजी आ.सुनील भुसारा यांनी पोलिसांच्या या उपक्रमाचे स्वागत करताना पोलिसिंग बरोबर समाजसेवा कशी करावी, याचे हे मूर्तीमंत उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थित जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रकाश निकम यांनी या भागातील बालविवाह थांबवण्याचे सर्वात मोठे काम येथील पोलीस प्रशासनानेच केले आहे.याशिवाय बालविवाह आता लपवू शकत नाही, त्यामुळे कोणीही बालविवाह करू नये,असे आवाहन केले. यावेळी नगराध्यक्ष अमोल पाटील यांनी देखील पोलिसांच्या या स्तुत्य उपक्रमाचे स्वागत केले.

या कार्यक्रमास चॅरिटेबल ट्रस्टचे दीपक मौर्या व विविध क्षेत्रातील मान्यवर व सर्व पोलीस पाटील,आडोशी आश्रम आश्रमशाळा डोलारा हायस्कूल येथील विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमावेळी आडोशी येथील विद्यार्थिनींनी बालविवाहबद्दल सुंदर नाटिका देखील सादर केली.

# मुरबाडमध्ये सर्पदंशाने महिलेचा मृत्यू

**मुरबाड, दि. १५ : प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्यात गावात महिलेचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली असून संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. महिलेला मुरबाड येथील शासकीय रुग्णालयात आणली असता अपुऱ्या सुविधांमुळे महिलेला जीव गमवावा लागला आहे. मिळालेल्या माहितीनुसार,मुरबाड तालुक्यातील चिखले गावात भारती नारायण भोईर (वय - ४५) असे सर्पदंशाने मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे.त्या गुरुवारी सायंकाळी ०६:३० च्या सुमारास स्वयंपाकासाठी घराच्या मागील बाजूस सरपण आणण्यासाठी गेल्या असता फाट्यांमध्ये लपलेल्या विषारी सापाने त्यांना दंश केला. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने मुरबाड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र येथे सर्पदंशावर उपचारासाठी आवश्यक कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना पुढील उपचारासाठी उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात नेण्यासाठी सांगण्यात आले. मात्र रुग्णालयात दाखल होताच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले आहे.

दरम्यान अशीच एक घटना शुक्रवारी सायंकाळी पिंपळगाव येथे विवेक वाघ वय - ६ या चिमुकल्यालाही सर्पदंशाची घटना घडली होती. सायंकाळी ०७:०० वाजेच्या सुमारास घडली होती. त्याला मुरबाड शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यालाही पुढील उपचारासाठी उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयात नेण्यासाठी सांगण्यात आले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू असून प्राथमिक माहितीनुसार हा दंश बिनविषारी सापाचा असावा, असा अंदाज सर्परक्षक प्रवीण भालेराव यांनी व्यक्त केला. दरम्यान,या सलग दोन घटनांमुळे मुरबाड शासकीय रुग्णालयाची विदारक अवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. नावाला रुग्णालय, मात्र आपत्कालीन सेवांचा अभाव अशीच स्थिती मुरबाड तालुक्यात आहे. सर्पदंश, गंभीर अपघात किंवा इतर तातडीच्या आजारांमध्ये रुग्णांना कल्याण, ठाणे किंवा मुंबई येथे धाव घ्यावी लागते. लांबचे अंतर, वाहतुकीचा ताण आणि वेळेअभावी यापूर्वीही अनेक रुग्णांचे जीव गेले आहेत.

दरम्यान, मुरबाड शासकीय रुग्णालयातील सुविधा नसल्याने आरोग्य सेवेचा बोजवारा उडाला असून सर्पदंशाची औषधे,अँटी-स्नेक व्हेनमचा पुरेसा साठा, प्रशिक्षित वैद्यकीय मनुष्यबळ आणि २४ तास अत्यावश्यक सेवा तात्काळ सुरू करण्याची जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# तलासरी भागात भूकंपाचा धक्का

**तलासरी, दि. १५ : प्रतिनिधी**

तलासरी भागात शनिवारी रात्री जोरदार भूकंपाचा धक्का बसला या धक्क्याने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी लोकांमध्ये सर्वत्र घबराट पसरली होती. तलासरी भागात शनिवारी रात्री नऊ वाजून अकरा मिनिटांनी भूकंपाचा जोरदार धक्का बसला. या धक्क्यामुळे तलासरी तालुक्यातील नागरिकांमध्ये भिती निर्माण झाली असून भूकंपाची नोंद २.२ रीष्टर म्हणून स्केल झाली आहे. या भूकंपाचा लॅटिट्युड २०.२ थर लांब ७२. ८६ व खोली ५ कि.मी. आणि ठिकाण नाशिक जिल्ह्याच्या पश्चिमेला ९७ कि.मी.अंतरावर भूकंप झाल्याची नोंद झाली आहे.या भूकंपामुळे कोणतेही मनुष्यहानी झाली नसल्याचे व नुकसानी झाले नसल्याची माहिती शासकीय यंत्रणेने दिली आहे.

# डहाणू येथे भव्य सांस्कृतिक महोत्सव

**डहाणू, दि. १५ : प्रतिनिधी**

डहाणू,पालघर जिल्ह्यातील आदिम संस्कृती, वारली चित्रकला आणि लोकपरंपरांचा सुगंध आता जागतिक पर्यटनाच्या नकाशावर दरवळणार आहे. अमूर्त सांस्कृतिक वारसा' जतन करण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत २० ते २२ फेब्रु. २०२६ दरम्यान डहाणू तालुक्यातील बापूगाव, गंजाड आणि घोलवड येथे तीन दिवसीय भव्य सांस्कृतिक महोत्सव - 'मातीच्या रंगाचे संमेलन' - आयोजित करण्यात आला आहे. दररोज सकाळी ११ ते सायं. ७ या वेळेत कार्यक्रम होणार आहेत. नोव्हें. २०२४ पासून सुरू झालेल्या या प्रकल्पाचा गाभा केवळ पर्यटनवाढ नसून, स्थानिक समुदायातील एक हजाराहून अधिक सदस्यांना सोबत घेऊन त्यांच्या पारंपरिक जीवनशैलीचे अर्थपूर्ण जतन करणे, हा उद्देश आहे. कला-हस्तकला कौशल्यविकास आणि कथाकथन प्रशिक्षणांमुळे स्थानिक कलाकार आपल्या संस्कृतीचे दूत बनले आहेत. 'लिव्हिंग हेरिटेज ट्रेल्स ऑफ पालघर' हे डिजिटल प्रदर्शन प्रदर्शित झाले आहे. आदिवासी ( वारली ) कलेचा सजीव अनुभव गंजाड आणि बापूगाव येथे जागतिक ख्यातीप्राप्त वारली चित्रकलेचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. गंजाड येथील सोमनाथ कल्मिपाडा मैदानावर पर्यटकांना वारली कला शिकण्याची संधी, पारंपरिक लोकनृत्यांचा आनंद आणि जिव्या सोमा म्हसे यांच्या कलासंग्रहाचे दर्शन घडणार आहे. बापूगाव येथील वारली चित्रकला केंद्र (आश्रमशाळेच्या मागे) येथे पर्यटक स्वतःच्या हाताने वारली चित्रकला साकारू शकतील, तारपा वाद्य बनवण्याचे प्रशिक्षण घेऊ शकतील आणि स्थानिक हस्तकलेची खरेदी करू शकतील. घोलवडमध्ये बांबू हस्तकला व चिकू सफर तसेच मराठी स्कूल मैदानावर बांबूपासून टोपल्या तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव, पारंपरिक लोकनृत्ये, ताजे समुद्री व स्थानिक खाद्यपदार्थांचा आस्वाद, तसेच चिकू फळबागांमधील पायवाटेने भ्रमंती अशी विविध आकर्षणे असतील. येथे उभारण्यात येत असलेल्या 'सामुदायिक संग्रहालयामुळे' स्थानिक वारशाचे दर्शन अधिक समृद्ध होणार आहे.

नृत्यगट नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा येथील गीत-नृत्य समूह पारंपरिक वाद्यांच्या गजरात सादरीकरण करून महोत्सवात चैतन्य निर्माण करतील.निसर्ग व खाद्यपर्वणी

पर्यटकांसाठी भीमबंध जलाशय, गंभीरगड, बोर्डी समुद्रकिनारा आणि कुर्न्झे धरण परिसर ही आकर्षणे खुली असतील. ताजे समुद्री अन्न, नाचणीचे पदार्थ आणि डहाणूचा प्रसिद्ध चिकू यांचा आस्वाद घेण्याची संधीही मिळणार आहे.

# वसई सेतू सुविधा केंद्रात बोगस स्वाक्षऱ्या

**वसई, दि. १५ : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांत वसई तहसीलदार कार्यालयातील सेतू सुविधा केंद्र विविध भ्रष्टाचार व अनागोंदीमुळे चर्चेत आलेले आहे. सदर सेतू कार्यालयाच्या ठेकेदारावर कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातून उपविभागीय अधिकारी शेखर घाडगे यांना आदेश देण्यात आले आहेत. आता आणखी एक प्रकरण उजेडात आले आहे.

विविध दाखल्यांसाठी देण्यात येणाऱ्या पावत्यांवर बोगस स्वाक्षऱ्या आढळून आल्या आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे स्वाक्षरी करणारे महसूल लिपिकच अस्तित्वात नाहीत. अश्या बोगस स्वाक्षऱ्या करणाऱ्या इसमाबाबत 'इंटरनॅशनल ह्यूमन राइट्स व क्राईम कंट्रोल कॉन्सिल' तर्फे तक्रार देण्यात आली आहे.

याच वसई सेतु मधे शासनाने ठरवून दिलेले दर डावलून सर्वसामान्य नागरिकाकडून चार ते पाच पटीने फी वसूल केली जाते, सदर ठिकाणी शिधापत्रिकांसाठी अनेक वर्षे पुरवठा विभागाचे लॉगिन आयडी वापरण्यात आले, जात प्रमाणपत्रांचे घोटाळे, नायब तहसीलदार दर्जाच्या अधिकाऱ्यांचे लॉगिन आयडी बेकायदेशीर रित्या वापरणे , बोगस पावत्या वापरणे असे अनेक गैर कायदेशीर प्रकार वसई सेतू सुविधा केंद्रात उघडकीस आले आहेत. तरीही यावर कारवाई केली जात नाही. येथील वरिष्ठ अधिकारी वर्ग सेतु संबधित ठेकेदार व त्यांचे हित संबंध सांभाळण्याचे काम बेकायदा खाजगी वाहन चालक करीत आले आहेत. असे चालक पुरवण्यासाठी



'माऊली,' नावाची व्यक्ती कार्यरत आहे. त्यांना विशेष अभय देण्यात येत आहे. त्यामुळे ही मंडळी कुठल्याही विभागात हस्तक्षेप करीत असतात. याबाबत कारवाईसाठी अनेक प्रकरणे प्रलंबित असताना सदर सेतू सुविधा केंद्रातून देण्यात येणाऱ्या पावत्यांवर तहसील लिपिकांच्या स्वाक्षरी न करता वसुली करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

यापूर्वी तहसील प्रशासनातर्फे स्वाक्षऱ्या करण्यासाठी महसूल लिपिक सेतू कार्यालयात नियुक्त असायचे. परंतु, आता ती बेकायदेशीर सेतू व्यवस्थापनाला देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे वेगवेगळ्या पावत्यांवर वेगवेगळ्या स्वाक्षऱ्या आढळून येतात. निर्गत दाखल्याची तारीख नागरिकांना दिली जाते. प्रत्यक्षात विहित मुदतीत दाखले वेळेवर मिळत नाहीत. परिणामी दलालांची मदत घ्यावी लागते. याबाबत कॉन्सिलचे अध्यक्ष डॉ. प्रशांत रमेश धोंडे यांनी वेळोवेळी शिष्टमंडळ नेऊन महसूल अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. तरीही या गैरबाबींबाबत वसई तहसीलदारांनी कुठलीच कारवाई केली नाही. असे निवेदनात म्हटले आहे.

सेतू सुविधा केंद्राच्या अनागोंदी कारभारापायी दाखला न मिळाल्यामुळे शैलेश सुरुंदा

या आदिवासी विद्यार्थ्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. तर अन्य एकाने सेतु कार्यालयात स्वतःवर केरोसिन ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला होता. वसई विधानसभेचे तात्कालीन आ. विवेक पंडित यांनी या विरोधात तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन केले होते. तरीही आजतायगत सेतुचा भ्रष्ट कारभार सुधारलेला नाही. बोगस स्वाक्षरीच्या धक्कादायक प्रकारा बाबत उपविभागीय अधिकाऱ्यांना सात दिवसाचा अल्टिमेटम देण्यात आला असून कारवाई न झाल्यास जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्याकडे दाद मागणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

याबाबत उपविभागीय अधिकारी शेखर घाडगे यांना विचारणा केली असता, सदर प्रकरणी वसई तहसीलदारांना लेखी सूचना देण्यात आली आहे. त्यांना सात दिवसाच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली.

### ...तरीही सेतू चालकांना शिधापत्रिका प्रक्रिया हवी

एकीकडे विविध प्रकरणात सेतू व्यवस्थापन दोषी आढळले असताना गेल्या अनेक वर्षापासून विविध प्रकरणात बेकायदेशीर प्रकार घडले आहेत. विशेष म्हणजे त्यास अधिकारी वर्गाने पाठीशी घातले. सेतू व्यवस्थापनाकडून शिधापत्रिका प्रक्रियांचा काढून टाकलेला कार्यभार पुन्हा देण्यासाठी काही घटक कार्यरत आहेत. शिधापत्रिका प्रक्रिया सेतू कार्यालयातून बंद केल्यापासून येथील भ्रष्टाचाराला व दलालांना चांगलीच ओहोटी लागली आहे. पुरवठा विभागातून मोफत शिधापत्रिका मिळू लागल्यामुळे दलालांचे व सेतू संस्था चालकांची मोठी अडचण झाली आहे. शिधापत्रिका प्रक्रियेत सेतू विभागातून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यास वाव असतो. त्यामुळे पुरवठा विभागातून शिधापत्रिका सेतू कार्यालयात आणण्यासाठी राजकीय ताकद व प्रसार माध्यमांचा पद्धतशीर वापर करणे सुरू आहे.





## कॅलिडोस्कोप















# जीवनदीप महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची सुवर्णपदकासह राष्ट्रीय पातळीवर झेप







**कसारा, दि. १५ प्रतिनिधी**

जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथील विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयातील कु. प्रसाद पोकळा (एम.ए. भाग १) याने इंटर कॉलेज ४ झोन स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले असून त्याची निवड अखिल भारतीय विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेसाठी झाली आहे. त्याच्या या यशामुळे महाविद्यालयाचा लौकिक अर्थातच अधिक उंचावला आहे. तसेच कु.साई सुंदरे (प्रथम वर्ष कला शाखा – FYBA) ह्याने ही संबंधित स्पर्धेत ५वा क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे, प्राचार्य डॉ. कैलास कळकटे, तसेच प्राध्यापकानी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान कामगिरीमुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# बांगलादेशच्या नव्या सरकारच्या शपथविधीसाठी भारतासह 13 देशांना खास आमंत्रण

**ढाका, दि. १५ वृत्तसंस्था**

शुक्रवारी रात्री बांग्लादेशातील निवडणूक आयोगाने निवडणुकीत विजयी झालेल्या नवनिर्वाचित खासदारांच्या नावांची अधिसूचना (गॅझेट) प्रसिद्ध केली. आता या अधिसूचनेमुळे विजयी खासदारांच्या शपथविधीचा आणि संसदेचा कार्यभार स्वीकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लवकरच नवीन सरकारच्या शपथविधीचा कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. हा शपथविधीचा कार्यक्रम मंगळवारी पार पडणार आहे. या कार्यक्रमाला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक देशांच्या प्रमुखांना आमंत्रण देण्यात आले आहे. चला तर जाणून घेऊया या शपथविधीला कोण-कोण येणार आहे?



बांग्लादेशात नॅशनलिस्ट पार्टीने (बीएनपी) अध्यक्ष तारिक रहमान यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुकीत विजय मिळवला आहे. तारिक रहमान हे पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. निवडणुकीतील विजयानंतर त्यांनी जनतेला संबोधित करताना देशात कोणत्याही परिस्थितीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले आहे. तसेच सुरक्षित आणि मानवाधिकारांचा सन्मान करणारा देश घडवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, अशी विनंती त्यांनी यावेळी केली होती. देश पुन्हा उभा करण्यासाठी प्रत्येक नागरिकाला जबाबदारीने भूमिका बजावावी लागेल. देशात कायदा आणि सुव्यवस्था राखणे याला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे, असे रहमान पत्रकार परिषदेत म्हणाले. तसेच या विजयाला त्यांनी 'जनतेचा विजय' असेही म्हटले आहे.

शपथविधीपूर्वी, अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनूस यांनी १३ देशांतील नेत्यांना या समारंभाला उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित केले आहे. त्यामध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही समावेश आहे, असे एएनआयने 'प्रथम आलो'च्या हवाल्याने वृत्त दिले आहे. आमंत्रित देशांमध्ये भारत, चीन, सौदी अरेबिया, तुर्की, पाकिस्तान, संयुक्त अरब अमिराती, कतार, मलेशिया, ब्रुनेई, श्रीलंका, नेपाळ, मालदीव आणि भूतान यांचा समावेश आहे. २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाच्या प्रचंड विजयानंतर हा समारंभ राष्ट्रीय संसदेच्या दक्षिण प्लाझा येथे आयोजित केला जाईल.

# पंखात बळ जिद्दीचे, घे तू पुन्हा भरारी...

**नाव - अथर्व चतुर्वेदी**
**शिक्षण - बारावी पास**
**वयोमान - फक्त १९**
**स्थळ - सर्वोच्च न्यायालय आणि समोर भारताचे मुख्य सरन्यायाधीश लक्ष्मी कांत**





सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठांसमोर अनेक नामवंत वकील आपल्या केसचा नंबर येण्याची वाट पाहत होते. सरन्यायाधीश लक्ष्मीकांत यांच्यासमोर एका याचिकेवर ऑनलाईन सुनावणी सुरू होती. याचिकार्त्यांनी सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीशांना, 'मला माझी बाजू मांडण्यासाठी फक्त दहा मिनिटांची संधी द्या...' अशी विनंती केली जाते. वकिलीचे कोणतेही प्रशिक्षण नसलेला अथर्व चतुर्वेदी नावाचा अवघ्या १९ वर्षाचा तरुण आपल्या शिक्षणाची कैफियत सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांसमोर मांडतो. एखाद्या कसलेल्या वकिलालाही लाजवेल अशा पद्धतीने मुद्देसूदरीत्या आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची मांडणी करून शिक्षण व्यवस्थेत असलेल्या प्रशासकीय त्रुटी न्यायालयाच्या लक्षात आणून देतो आणि न्यायदानाचे आवाहन करतो. पुढच्या काही क्षणातच सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येतो. तो म्हणजे, सर्वोच्च न्यायालय राज्य सरकार आणि नॅशनल मेडिकल कौन्सिल म्हणजेच राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाला त्वरित अथर्व चतुर्वेदी याला वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालय जारी करते. आपल्या दुर्दम्य इच्छा शक्तीच्या बळावर सुयोग्य प्रयत्न केले तर कोणतीही गोष्ट अवघड नसते. फक्त गरज असते ती आलेल्या प्रसंगांना संयमाने आणि खंबीरपणे तोंड देत सामोरे जाण्याची, हेच या घटनेतून दिसून आले आहे.

अथर्व चतुर्वेदी हा जबलपूरचा रहिवासी आहे. त्याने नीट परीक्षा दोनवेळा पास केली आहे. नीट परीक्षेत त्याला ५३० गुण मिळाले होते. त्याप्रमाणे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातून म्हणजेच इडब्लूएस मधून प्रवेश मिळणे क्रमप्राप्त होते. मात्र मध्यप्रदेश सरकारने खाजगी वैद्यकीय महाविद्यालयात ई डब्ल्यू एस आरक्षणाबाबत स्पष्ट धोरण आखलेले नाही. त्यामुळे त्याचे वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे स्वप्न भंग होण्याची वेळ आली होती. अथर्वने बारावीत असताना गणित आणि जीवशास्त्र हे दोन्ही विषय घेतले असल्यामुळे त्याची निवड तेथील एका शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये इंजीनियरिंग साठी झाली होती. परंतु त्याला डॉक्टर व्हायचे होते म्हणून त्याने तेथील उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. मात्र उच्च न्यायालयानेही इ डब्ल्यू एस आरक्षणाबाबत सुस्पष्टता नसल्यामुळे अथर्वची मागणी अमान्य केली. मात्र तेथील न्यायाधीशांनी तुम्ही डॉक्टर होण्यापेक्षा वकील व्हा. वकिली व्यवसायात तुमच्यासाठी उत्तम संधी आहेत. अशी शाबासकीची थापही दिली.

या ठिकाणी अथर्वच्या जागी दुसरा कोणी असता तर त्याने शांतपणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून इंजिनिअरिंगचे प्रशिक्षण पूर्ण केले असते. मात्र डॉक्टर होण्याच्या जिद्दीमुळे तो गप्प बसला नाही. त्याने थेट सुप्रीम कोर्टात धाव घेतली. एमबीबीएस प्रवेशासाठी असलेल्या सर्व कसोट्या मी पार केलेल्या आहेत. माझ्याकडे त्यासाठी लागणारे गुण सुद्धा आहेत, त्यामुळे एमबीबीएस ला प्रवेश मिळणे हा माझा हक्क आहे. एका विद्यार्थ्याचा हक्क मिळवून देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून माझ्या शिक्षणाचे द्वार खुले करावे, अशी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना म्हणजेच सरन्यायाधीश लक्ष्मी कांत यांना त्याने विनंती केली. त्याच्या युक्ती वादामुळे सर्वोच्च न्यायालय निव्वळ प्रभावितच झाले नाही तर न्यायालयाने आपल्या अखत्यारीतील कलम १४२ चा वापर करून राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाला आणि मध्य प्रदेशच्या सरकारला इ डब्ल्यू एस प्रवर्गातील सर्व पात्र उमेदवारांना सात दिवसाच्या आत प्रवेश मिळायला हवा आणि त्यांना कॉलेजचे वाटप करण्यात यावे असे स्पष्ट आदेश दिले. वडील पेशाने वकील असल्यामुळे त्यांच्या कामाची पद्धत तो पाहत होता. जीवशास्त्रात रमणाऱ्या अथर्वने जेव्हा कठीण प्रसंग आला तेव्हा विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कांसाठी संविधानातील कलमांचाही अभ्यास केला. सर्वोच्च न्यायालयात ऑनलाईन झालेल्या सुनावणीत भक्कमपणे आपली बाजूही मांडली आणि निव्वळ स्वतःलाच नाही तर त्याच्याप्रमाणे इतरही वंचित राहणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांनाही त्यांनी न्याय मिळवून दिला.

निव्वळ धोरण स्पष्टता नसल्यामुळे कित्येक विद्यार्थ्यांना आजही आपल्या आवडीच्या शैक्षणिक शाखेत प्रवेश घेता येत नाही. ज्ञानदाना ऐवजी निव्वळ नफा कमवण्याचे साधन म्हणून या क्षेत्राकडे पाहणाऱ्या शिक्षण सम्राटांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे चांगलीच चपराक बसलेली आहे. तरीही अथर्व चतुर्वेदी या विद्यार्थ्याने आपल्या जिद्दीच्या बळावर दिलेला हा लढा साधासुधा नव्हता. रिल्स च्या दुनियेत वावरणाऱ्या आजच्या तरुणाईने यापासून अवश्य बोध घ्यायला हवा आणि आपल्यातील सुप्त गुणांचा शोध घ्यायला हवा. शेवटी इतकेच म्हणायचे वाटते की,

**खडतर अवघड वाटही**
**प्रयत्नाने होते पार...**
**इच्छा शक्तीच्या जोरावर**
**नशिबाचेही उघडते दार...**
**पंखात बळ जिद्दीचे,**
**घे तू पुन्हा भरारी...**
**दाही दिशात घुमू दे**
**तव यशाची तुतारी...**



**गजानन तुपे**
**निवासी संपादक**
**दैनिक महासागर, मुंबई**
gajanantupe2@gmail.com

# राष्ट्रीय योजनेअंतर्गत १५ तलावांचे संवर्धन व पुनर्स्थापना करण्याचा पालिकेचा आराखडा

**मुंबई , दि. १५ प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिका शहरातील सुमारे १५ तलावांचे संवर्धन आणि पुनर्स्थापना 'राष्ट्रीय तलाव संवर्धन योजने'अंतर्गत करण्याचा विचार करत आहे. यासाठी लवकरच व्यवहार्यता अभ्यास, पाण्याची तपासणी आणि तलावांचे सर्वेक्षण करण्यासाठी सल्लागार नेमण्यात येणार आहे. दरम्यान, तीन तलावांच्या पुनर्स्थापनेचे काम सध्या सुरू असून ते पूर्णत्वास येण्याच्या मार्गावर आहे, तर आणखी एका तलावासाठी निविदा मंजूर करण्यात आली आहे.

बीएमसीच्या पर्यावरण विभागातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, "प्रथम आम्ही सल्लागार नेमणार आहोत. ते बहुतेक तलावांचा, विशेषतः बीएमसीच्या पी-नॉर्थ प्रभागातील तलावांचा, सर्वेक्षण करतील. तलावांच्या पुनर्स्थापनेची व्यवहार्यता तपासताना पाण्याची गुणवत्ता, पाण्याचे येणारे स्रोत त्यात सांडपाण्याचाही समावेश आणि तलावांमध्ये सांडपाणी वा दूषित पाणी जाणे कसे थांबवता येईल याचा अभ्यास केला जाईल. तसेच तलावांचे सुशोभीकरणही करण्यात येईल." काही तलावांची मालकी महसूल विभाग आणि इतर सरकारी संस्थांकडे असल्याने कोणतेही काम हाती घेण्यापूर्वी त्यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असेल, असेही सल्लागारांनी नमूद केले. निविदा कागदपत्रांची तयारी करण्यातही सल्लागार मदत करतील. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, कुरळ्यातील शीतल तलाव, सायन तलाव आणि कांदिवलीतील दिंगेश्वर तलाव यांच्या पुनर्स्थापनेचे काम सुरू आहे. "बांद्रा तलावाच्या बाबतीत पुनर्स्थापना कामासाठी निविदा मंजूर करण्यात आली आहे. तलावात सांडपाणी थेट जाऊ नये यासाठी १ एमएलडी क्षमतेचा एमबीआर तंत्रज्ञानावर आधारित सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारला जात आहे. तसेच गाळ काढण्याचे कामही पुनर्स्थापना योजनेचा भाग म्हणून केले जाईल. बहुतेक तलाव सांडपाण्यामुळे प्रदूषित झाले असून त्यामुळे पाण्याच्या गुणवत्तेवर मोठा परिणाम झाला आहे. पुनर्स्थापनेनंतर निवडलेल्या तलावांतील पाणी अंघोळीच्या दर्जाचे असेल, याची खात्री करण्याचा आमचा प्रयत्न आहे," असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

तलावांच्या पुनर्स्थापनेसाठीचा निधी महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाकडून दिला जाणार असून प्रत्यक्ष अंमलबजावणी इतर संबंधित विभागांकडून केली जाण्याची शक्यता आहे.

# चुकीच्या हेअरकट विरोधात सात वर्षे लढा
## मॉडेलला मिळणार २५ लाखांची भरपाई

**नवी दिल्ली, दि. १५ वृत्तसंस्था**



दिल्लीतल्या एका पंचतारांकित हॉटेलमध्ये बॅड हेअरकट केल्याने महिला संतापली होती. तिने हॉटेलविरोधात कोर्टात दावा केला आणि २ कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी केली होती. सदर महिलेने सात वर्षे लढा दिला. ज्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी हॉटेलला २५ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. आशना रॉय असं या महिलेचं नाव आहे. न्यायालयाने या प्रकरणात आयटीसी मौर्या या दिल्लीतल्या हॉटेलला सदर महिलेला २५ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

आशना रॉय नावाच्या महिलेने २०१८ मध्ये एक याचिका दाखल केली होती. आशना रॉय ही एक मॉडेल आहे. तिने सांगितलं की आयटीसी मोर्या हॉटेलमध्ये तिचा हेअरकट चुकीच्या पद्धतीने करण्यात आला. याची भरपाई म्हणून मला २ कोटी रुपये मिळावेत. राष्ट्रीय ग्राहक तंटामुक्त आयोगाकडेही तिने धाव घेतली होती. प्रकरण सात वर्षे चाललं आणि जेव्हा सर्वोच्च न्यायालयात गेलं तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केलं की आशना रॉय यांनी जे पुरावे न्यायालयात सादर केले आहेत ते पुरेसे नाहीत. फोटो कॉपी पुरावे म्हणून जोडण्यात आल्या आहेत त्यामुळे आम्ही त्या ग्राह्य धरणार नाही.

आशना रॉय ने सुरुवातीला ग्राहक मंचाकडे या संदर्भात तक्रार केली. आयटीसी मोर्या हॉटेलमध्ये असलेल्या सलूनमध्ये तिने केस कापले आणि तिचा हेअरकट वाईट झाला म्हणून तिने ही धाव घेतली होती. साधारण वर्षभराने आयोगाने निर्णय दिला की या प्रकरणात आयटीसी हॉटेलची चूक आहे त्यांनी दोन कोटी रुपये भरपाई द्यावी. या प्रकरणानंतर आयटीसी ग्रुपने सर्वोच्च न्यायालयात २०२३ मध्ये धाव घेतली. राष्ट्रीय ग्राहक तंटामुक्त आयोगाचा निकालाला आव्हान देण्यात आलं. जो निर्णय आयोगाने दिला आहे तो आम्हाला मान्य नाही. भरपाईची रक्कम खूप जास्त आहे आणि त्यासाठी लागणारे आवश्यक असे पुरावेही आशनाकडे नाहीत असाही दावा करण्यात आला. ज्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात उभं राहिलं. आता सर्वोच्च न्यायालयाने सदर महिलेला २५ लाख रुपये भरपाई द्या असे आदेश आयटीसी मौर्याला दिले आहेत.

# मोबाईल ऑनलाइन चोरीला आळा घालण्यासाठी एअरटेलची "फ्रॉड अलर्ट" सुविधा

स्पॅम आणि ऑनलाइन फसवणूकीच्या वाढत्या समस्येला आळा घालण्यासाठी एअरटेलने आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून 'फ्रॉड अलर्ट' ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवी अत्याधुनिक सुविधा सुरु केली आहे. 'फ्रॉड अलर्ट' ही नाविन्यपूर्ण प्रणाली ग्राहकांच्या वन-टाइम पासवर्ड संबंधित बँक फसवणूकींपासून तत्काळ प्रभावीपणे संरक्षण देते. ही प्रणाली कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असल्याने संशयास्पद व्यवहार ओळखते. सवणूकीचे व्यवहार होण्याची शक्यता असल्यास ही प्रणाली तत्काळ ग्राहकांना संबंधित व्यवहाराबद्दल सूचित करते. त्यामुळे एअरटेलचे ग्राहक ऑनलाइन फसवणूकीच्या व्यवहारातून पूर्णपणे सुरक्षित झाले आहे. घरात ऑनलाईन ऑर्डरच्या माध्यमातून येणारे पार्सल किंवा अन्नपदार्थांचे वितरण होण्याकरिता ग्राहकांच्या मोबाईलनंबरवर येणा-या ओटीपीची मागणी केली जाते. घरपोच होणारे वितरण स्विकारताना अनेकांची लगबग

**लोकार्थ**




सुरु असते. सायबर भामटे लोकांची होणारी धावपळ लक्षात घेत त्याचा गैरफायदा घेतात. ओटीपी ग्राहकांच्या बँकेतील व्यवहारांशी संबंधित गोपनीय ओटीपी असण्याची शक्यता असते. ग्राहकांकडून अनावधानाने दिलेला ओटीपी सायबर भामटे ऑनलाइन चोरीकरिता वापरुन ग्राहकांना लुबाडतात.

*एअरटेलची कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवी यंत्रणा अशा संभाव्य धोक्यांना वेळीच ओळखते. ग्राहकांना तातडीने सावध करते. मोबाईलवर एखाद्या संशयास्पद कॉलदरम्यान बँकेचा ओटीपी संदेश आल्यास ही यंत्रणा सतर्क होते. मोबाईलवर आलेल्या संदेशातून फसवणूक होत असल्याचे ग्राहकांच्या निदर्शनास आणून देते.

# सुरक्षित एआय प्रशासनासाठी ॲक्सिस बँक जागतिक स्तरावरील पहिली वित्तीय सेवा संस्था

भारतातील सर्वात मोठ्या खाजगी क्षेत्रातील बँकांपैकी एक ॲक्सिस बँक ही आंतरराष्ट्रीय मानक, आयएसओ/आयईसी ४२००१ माहिती तंत्रज्ञान कृत्रिम बुद्धिमत्ता व्यवस्थापन प्रणाली (एआयएमएस) साठी बीएसआय द्वारे प्रमाणित होणारी जागतिक स्तरावरील पहिली वित्तीय सेवा संस्था बनली आहे. बँकेच्या आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) प्रशासन, जोखीम व्यवस्थापन आणि प्रकल्प अंमलबजावणी पद्धतींचे मूल्यांकन करणाऱ्या व्यापक ऑडिटनंतर, ॲक्सिस हाऊस वरळी येथे झालेल्या सादरीकरण समारंभात ॲक्सिस बँकेला औपचारिकपणे प्रमाणपत्र देण्यात आले.जागतिक स्तरावर लागू असलेले हे मानक एआयचे सुरक्षित व्यवस्थापन सक्षम करण्यासाठी आणि समाजात त्याच्या सुरक्षित आणि जबाबदार वापरासाठी आवश्यक असलेला विश्वास निर्माण करण्यासाठी डिझाइन केले आहे. हे संस्थांना एआयच्या जबाबदार तैनातीत मदत करते, ज्यामध्ये अपारदर्शक स्वयंचलित निर्णय घेणे, मानवी-कोडेड लॉजिकऐवजी मशीन लर्निंगचा वापर आणि सतत शिक्षणाची आवश्यकता यासारख्या प्रमुख बाबींवर लक्ष केंद्रित केले जाते.

# भारत-अमेरिका ५०० अब्ज डॉलर्सच्या व्यापाराच्या प्रवासाला सुरुवात

वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईने भारत-अमेरिका व्यापार करारावरील अंतरिम कराराच्या घोषणेचे हार्दिक स्वागत केले आहे, जे जगातील सर्वात परिणामकारक धोरणात्मक आणि आर्थिक भागीदारींपैकी एक मजबूत करण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या पत्रकार परिषदेनंतर दोन्ही देशांनी जारी केलेल्या संयुक्त निवेदनात, व्यापार कराराचे विस्तृत रूपरेषा आणि या वर्षी मार्चपर्यंत अंतिम बीटीए पूर्ण करण्याची तात्पुरती अंतिम मुदत स्पष्ट करण्यात आली.

अंतरिम व्यापार कराराबद्दल बोलताना, वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईचे अध्यक्ष आणि ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष डॉ. विजय कलंत्री म्हणाले, "या कराराची रूपरेषा उघड न झाल्यामुळे व्यापार कराराच्या घोषणेला मोजक्या प्रतिसादांचा सामना करावा लागला. आजच्या संयुक्त निवेदनामुळे, हे स्पष्ट होते की हा व्यापार करार भारताच्या दीर्घकालीन प्रयत्नांना पाठिंबा देईल, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात आपले स्थान मजबूत होईल आणि त्याचबरोबर भू-राजकीय आणि भू-आर्थिकदृष्ट्या आपले द्विपक्षीय संबंध मजबूत होतीलअंतरिम व्यापार करारामुळे रत्ने आणि दागिने, औषधनिर्माण, कृषी उत्पादने, ऑटो घटक, स्मार्टफोन इत्यादी महत्त्वाच्या निर्यात उत्पादनांसाठी शुल्क ५०% वरून जवळजवळ शून्यावर येईल. यामुळे आम्हाला इतर खेळाडूंच्या तुलनेत उच्च शुल्क फरक मिळतो, ज्यामुळे एमएसएमई आणि रोजगार निर्मितीला पाठिंबा देणारी आमची निर्यात स्पर्धात्मकता मजबूत होते"

# मुंबईत दृष्टीकोनच्या दुसऱ्या आवृत्तीचे आयोजन




यूपीईएस देहरादून, ही अग्रगण्य मल्टी-डिसिप्लिनरी आणि रिसर्च युनिव्हर्सिटी, यांनी मुंबईत दृष्टीकोनच्या दुसऱ्या आवृत्तीचे आयोजन केले. यूपीईएसने दृष्टीकोन हा दीर्घकालीन स्ट्रॅटेजिक प्लॅटफॉर्म म्हणून सुरू केला आहे. हा एक इनवाइट-ओन्ली क्लोज्ड-डोअर लीडरशिप फोरम आहे एक असा "थिंकिंग रूम" जिथे वरिष्ठ इंडस्ट्री लीडर्स आणि यूपीईएसचे अकॅडमिक लीडरशिप भविष्यातील काम टॅलेंट आणि लर्निंगवर खुलेपणाने चर्चा करतात. हा मंच असा माहोल तयार करतो जिथे लोक निर्धास्तपणे आपले विचार मांडतात, कठीण प्रश्नांवर जबाबदारीने चर्चा होते, आणि भविष्याशी जोडलेल्या कल्पना इंडस्ट्री आणि एज्युकेशनमधील अधिक चांगल्या अलाइनमेंटमध्ये बदलतात. दृष्टीकोन 2.0चा फोकस एआय-ड्रिव्हन जगात लीडरशिप आणि लर्निंगवर होता. "द कॉन्फ्लुएन्स ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड ह्युमन इंटेलिजन्स" या थीमवर आधारित या फोरममध्ये विविध सेक्टरमधील सीनियर लीडर्स सहभागी झाले. यामध्ये सुमित कपूर, पार्टनर, रिस्क अँडव्हायझरी, केपीएमजी इन इंडिया; समीर पितळवाला, हेड ऑफ गेमिंग एपीएसी, गूगल क्लाउड; लक्ष्मी देशपांडे, हेड ऑफ एक्सआर इनोव्हेशन अँड डिझाइन, टीसीएस; जी. एस. सेल्विन, एक्झिक्युटिव्ह वाइस प्रेसिडेंट, रोल्स-रॉइस इन इंडिया अँड मॅनेजिंग डायरेक्टर, एमटीयू इंडिया; यांचा समावेश होता. दृष्टीकोन 2.0मधून एक सामायिक संदेश स्पष्ट झाला: एआय वेगाने वर्कला रेशेप करेल, पण आउटकम्स, अकाउंटेबिलिटी आणि ह्युमन जजमेंट केंद्रस्थानी राहिले पाहिजे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# जर्मनीमध्ये पाकिस्तानची लाज निघाली
## सुरक्षा रक्षकाने मागितले असीम मुनीर यांचे ओळखपत्र

**म्युनिक, दि. १५ वृत्तसंस्था**



जर्मनीतील म्युनिक सुरक्षा परिषदेदरम्यान पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांना लाज वाटली. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना कॉन्फरन्स हॉलमध्ये प्रवेश करताना त्यांचे ओळखपत्र दाखवण्यास सांगितले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाला आहे.

असीम मुनीर कॉन्फरन्स हॉलमध्ये प्रवेश करण्यासाठी पुढे जात असताना, एक सुरक्षा रक्षक त्यांना थांबवतो. गार्ड त्यांना विचारतो की त्यांचे ओळखपत्र कुठे आहे आणि ते दाखवण्यास सांगतो. काही सेकंदांनंतर, त्यांची ओळख पटवली जाते आणि त्यांना आत जाण्याची परवानगी दिली जाते.

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, वादविवाद सुरू झाला आहे. सोशल मीडियावर अनेकजण याला पाकिस्तानसाठी राजनैतिक लाजिरवाणे म्हणत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की एखाद्या देशाच्या लष्करप्रमुखांशी संबंधित अशा घटनेमुळे त्यांच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेवर परिणाम होतो. दरम्यान, इतर लोक ही घटना सामान्य मानत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, म्युनिक सुरक्षा परिषदेसारख्या मोठ्या, उच्च-सुरक्षा कार्यक्रमांमध्ये, प्रत्येक व्यक्तीची ओळख तपासली जाते, मग तो कितीही उच्च पदावर असला तरी त्याची चौकशी करण्यात येते.

# वेस्ट इंडिजचा सुपर-८ मध्ये प्रवेश



**मुंबई, दि. १५ प्रतिनिधी**

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात वेस्ट इंडिजने नेपाळवर ९ गडी राखून दिमाखदार विजय मिळवला. या विजयासह वेस्ट इंडिजने ग्रुप सी मधून अधिकृतपणे सुपर-८ फेरीचे तिकीट मिळवले आहे. दुसरीकडे, सलग तिसऱ्या पराभवामुळे नेपाळचा या विश्वचषकातील प्रवास संपुष्टात आला आहे.

वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि तो अचूक ठरवला. नेपाळकडून दिपेंद्र सिंग ऐरी (५८) याने एकहाती झुंज देत अर्धशतक झळकावले. मात्र त्याच्याशिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. वेस्ट इंडिजच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर नेपाळचा डाव १३३ धावांवर आटोपला. वेस्ट इंडिजकडून जेसन होल्डरने सर्वाधिक ४ बळी घेत नेपाळच्या फलंदाजीचा कणा मोडला.

१३४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजने सुरुवातीपासून आक्रमक भूमिका घेतली. कर्णधार शे होप (६१) आणि शिमरोन हेटमायर (४६ ) यांनी शानदार भागीदारी करत संघाला विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचवले. अखेरीस वेस्ट इंडिजने केवळ १५.२ षटकांत लक्ष्य गाठत एकतर्फी विजय साकारला.

वेस्ट इंडिजने या स्पर्धेत आतापर्यंत कमालीचे सातत्य दाखवले आहे. ३ सामन्यांत ३ विजय मिळवत त्यांनी ६गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थान गाठले आहे. नेपाळने दिलेले लक्ष्य विंडीजच्या फलंदाजांनी अवघ्या एका विकेटच्या मोबदल्यात पूर्ण केले. वेस्ट इंडिजच्या या विजयामुळे त्यांचा नेट रन रेट १.८२० इतका जबरदस्त झाला आहे. नेपाळच्या संघाला या स्पर्धेत अद्याप एकही विजय मिळवता आलेला नाही. ३ सामन्यांत ३ पराभव पदरी पडल्याने ते गुणतालिकेत शेवटच्या स्थानावर आहेत. त्यांच्या नावासमोर आता अधिकृतपणे एलिमिनेटेड असे लागले असून, उरलेला सामना आता केवळ औपचारिक असेल.

# मणिपूरमध्ये दोन महिलांसह तीन दहशतवाद्यांना अटक

**इम्फाळ, दि. १५ वृत्तसंस्था**

मणिपूरच्या दोन जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या बंदी घातलेल्या संघटनांशी संबंधित दोन महिलांसह तीन दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. शनिवारी तेंगनुपाल आणि इम्फाळ पूर्व जिल्ह्यांमध्ये अटक करण्यात आली, असे पोलिसांनी निवेदनात म्हटले आहे.

तेंगनुपाल जिल्ह्यातील सनराईज ग्राउंडच्या परिसरातून सुरक्षा दलांनी बंदी घातलेल्या पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए) या संघटनेच्या दोन महिला कार्यकर्त्यांना अटक केली. त्यांची ओळख अकोइजाम सखेनबी (२३) आणि चोंगथम हेम्बाबी (१७) अशी झाली आहे. बंदी घातलेल्या प्रेपाक (प्रो) संघटनेशी संबंधित एका दहशतवाद्याला इंफाळ पूर्व जिल्ह्यातील नापेटपल्ली येथून अटक करण्यात आली.

त्याचे नाव इंगुडम इंगोचा सिंग (५०) असे आहे आणि त्याच्या ताब्यातून पाच काडतुसे भरलेली .३२ पिस्तूल जप्त करण्यात आली आहे. दरम्यान, शुक्रवारी चुराचंदपूर जिल्ह्यातील सिजांग कुकी गावाजवळ सुरक्षा दलांनी १० किलो आयईडी जप्त केला. बॉम्ब निकामी करणाऱ्या पथकाने तो सुरक्षितपणे निकामी केला, असे त्यात म्हटले आहे.

महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, Group Editor-in-Chief and Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - **Sandeep Ramrao Kale,** Managing Editor **- Pankaj Shrikrishna Chandak** Resident Editor**- Deepak Mohite.**

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. **समूह मुख्य संपादक व संचालक - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३), समूह संपादक - संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक - पंकज श्रीकृष्ण चांडक निवासी संपादक : दीपक मोहिते**
Email : mumbaimahasagar@gmail.com
RNI No.: MAHAMAR/2014/62313